POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२०९ ● मुंबई, सोमवार, ०२ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## नागपूरच्या काटोलमध्ये भीषण स्फोट

### पहाटे मोठा आवाज आला अन् एका क्षणात राखेचा ढिगारा... २० जण होरपळले

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

रविवारी सकाळी ७ वाजता नागपूरमधील कटोल तालुक्यात स्फोट झाला आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथे असलेल्या एसबीएल एनर्जीमध्ये या दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीत रविवारी सकाळी सातच्या सुमारास एक भीषण स्फोट झाला होता. या दुर्घटनेत किमान १५ कामगारांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून २० हून अधिक कर्मचारी जखमी झाले आहेत. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



#### दोषींवर कडक कारवाई करा, स्थानिकांची मागणी

या अपघातामुळे स्फोटक कारखान्यांमधील कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कंपनी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि कामगारांच्या नातेवाईकांकडून केला जात आहे. प्रशासनाने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले असून, दोषींवर कडक कारवाईची मागणी होत आहे. दरम्यान या दुर्घटनेनंतर कंपनी प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या कारखान्यांच्या सुरक्षिततेचे निकष पाळले जात आहेत की नाही, याची कसून चौकशी होणे गरजेचे आहे. या भीषण घटनेमुळे पुन्हा एकदा औद्योगिक सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

#### स्फोटाची तीव्रता प्रचंड... इमारत कोसळली

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरच्या एसबीएल कंपनीत पहाटेच्या सुमारास हा स्फोट झाला. यावेळी या कारखान्यातील काम सुरू होते. त्याचवेळी अचानक हा स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की संपूर्ण कारखाना जळून खाक झाला. तसेच या कारखान्याची मुख्य इमारत पूर्णपणे जमीनदोस्त करण्यात आली. या स्फोटाचा आवाज दूरपर्यंत ऐकू आला. यावेळी स्फोटामुळे कारखान्याचे अवशेष अर्धा किलोमीटर अंतरापर्यंत उडाले. तसेच स्फोटानंतर इमारतीचा ढिगारा पडल्याने त्या ढिगाऱ्याखाली आणखी काही कामगार अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. सध्या या कंपनीत झालेल्या स्फोटामुळे लागलेली आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच पोलीस, स्थानिक प्रशासन आणि कंपनीचे बचाव पथक ढिगारा उपसण्याचे काम युद्धपातळीवर करत आहे. जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यातील काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे.

## नागपूर बनलय कामगारांच्या मृत्यूचा सापळा

### एसबीएल कंपनीच्या स्फोटात १७ जणांच्या मृत्यूला जबाबदार कोण?

काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील 'एसबीएल एनर्जी लिमिटेड' या स्फोटक कंपनीत सकाळी झालेल्या भीषण स्फोटात १७ कामगारांचा मृत्यू झाला. तर १८ कामगार गंभीर जखमी झाले. मृतक व जखमींमध्ये बहुतांश महिलांचा समावेश आहे. मृतांचा आकडा वाढवण्याची शक्यता आहे. या घटनेची दाहकता इतकी होती की आजुबाजूच्या गावांमध्येदेखील स्फोटाचे हादरे जाणवले. महत्त्वाचं म्हणजे बाजार गाव काटोल दरम्यान असलेल्या स्फोटक आणि बारूद कंपन्यांमध्ये होणाऱ्या स्फोटांच्या घटनांमुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलाय.

**रइछ कंपनीच्या कारभारावर बोट!**

नागपुरात झालेल्या या स्फोटानंतर रइछ कंपनीच्या कारभारावर बोट ठेवण्यात आलाय. 'एसबीएल एनर्जी लिमिटेड' या कंपनीकडे प्रामुख्याने डेटोनेटर्स उत्पादनाचे काम होतं. या कंपनीत आजुबाजूच्या गावांमधील महिला प्रामुख्यानं कामाला आहेत. सकाळच्या शिफ्टमध्ये शेकडो कामगार कामावर आले होते. 'नोनल क्रिम्पिंग' या युनिटमध्ये 'डेटोनेटर्स सेल'च्या पॅकिंगचे काम सुरू होतं. दरम्यान, सकाळी सात वाजताच्या सुमारास जोरदार स्फोट झाला आणि काही कळायच्या आतच आगीचे लोळ उडाले.

**मुख्यमंत्र्यांकडून सखोल चौकशीचे आदेश**

याआधीही स्फोटकं बनवणाऱ्या कंपन्यांमध्ये स्फोटाचे प्रकार घडलेत. मात्र कंपनी सुरक्षेची पुरेशी काळजी घेत नसल्यामुळेच स्फोट झाल्याचा आरोप महाराष्ट्र बारुद कामगार संघटनेचे उपाध्यक्ष पियुष फिरस्ट यांनी केलाय. तसेच मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलीय. सर्व कंपन्यांचं ऑडिट झालं पाहिजे सुरक्षा तपासणी होईपर्यंत कंपन्या बंद ठेवा अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केलाय. तर मृत्यू झालेल्या प्रत्येक कामगाराला ५० लाखांची मदत देण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केलीय. तसेच, ह्यएसबीएल कंपनीतील स्फोटानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुख व्यक्त करत सखोल चौकशीचे आदेश दिलेत.

**कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

स्फोटक तयार करणाऱ्या कंपन्यांमध्ये वारंवार होणाऱ्या स्फोटांच्या घटनांमुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलाय. शासनाने याबाबत आता कठोर नियमावली बनवत पावलं उचलण्याची गरज आहे.

## मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवेला कोकणवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### पहिल्याच दिवशी 'हाऊसफुल्ल' बुकिंग

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीने मुंबई ते विजयदुर्ग दरम्यान सुरू होणाऱ्या आशियातील सर्वात जलद 'एम-टू-एम' रो-रो जलवाहतूक सेवेला कोकणवासीयांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला आहे. उद्या, रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता मुंबईतील भाऊचा धक्का येथे या सेवेचा शुभारंभ मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते पार पडणार आहे. यानंतर ही बोट विजयदुर्गकडे प्रस्थान करणार असून, या प्रवासासाठी प्रवाशांनी पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणात बुकिंग केले आहे. पहिल्याच दिवशी विविध श्रेणींमधून जवळपास सर्वच तिकीट बुकिंग होत आली आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले आहे की, सुमारे ६२६ प्रवासी आणि मोठ्या संख्येने वाहने वाहून नेण्याची क्षमता असलेले हे अत्याधुनिक रो-रो जहाज मुंबई ते विजयदुर्ग हे अंतर अवघ्या ६ ते ७ तासांत पूर्ण करणार आहे. सुरक्षित आणि आरामदायी समुद्रप्रवासासोबतच पर्यटकांना कोकणचा




विस्तीर्ण निसर्गरम्य समुद्रकिनारा अनुभवण्याची संधी या निमित्ताने मिळणार आहे. ही सेवा महाराष्ट्राच्या सागरी वाहतुकीच्या इतिहासातील एक नवीन आणि वैभवशाली अध्याय ठरणार असून, भविष्यात या सेवेमुळे रस्ते वाहतुकीवरील ताण लक्षणीयरीत्या कमी होईल. कोकणाला वेगवान कनेक्टिव्हिटी देण्यासाठी आणि राज्याच्या सागरी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हा प्रकल्प एक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अखेर प्रत्यक्षात साकार झाला आहे. या प्रतिसादाबद्दल बोलताना मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, कोकणवासीयांनी या सेवेचे केलेले स्वागत हे या प्रकल्पाच्या यशाची पावती आहे. या सेवेमुळे केवळ वेळेची बचत होणार नाही, तर कोकणातील पर्यटन, स्थानिक व्यापार आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळेल. उद्याच्या पहिल्या फेरीसाठी झालेल्या बुकिंगच्या तपशिलानुसार, सर्वाधिक पसंती इकोनॉमी श्रेणीला मिळाली असून प्रीमियम श्रेणी, बिझनेस श्रेणी आणि प्रथम दर्जा (फर्स्ट क्लास) श्रेणीत देखील प्रवाशांनी आपले स्थान आरक्षित केले आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी रु. ३,००० पासून रु. ९,००० पर्यंतचे विविध तिकीट दर निश्चित करण्यात आले आहेत. केवळ प्रवासीच नव्हे तर वाहनांच्या वाहतुकीसाठीही या सेवेला उत्तम प्रतिसाद लाभला असून, पहिल्याच दिवशी चारचाकी आणि दुचाकी वाहनांचे बुकिंग मोठ्या प्रमाणात झाले आहे. या प्रतिसादावरून मुंबई-कोकण प्रवासासाठी ही सेवा किती आवश्यक आहे हे स्पष्ट होते.

## मुदत संपलेल्या औषध विक्रीचा प्रकार उघडकीस

### एफडीएकडे गुन्हा नोंद करण्याची मागणी

■वसई। प्रतिनिधी,

वसई येथे मुदत संपलेले औषध विक्री केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून संबंधित मेडिकल स्टोअरविरुद्ध कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.




वसई (प.) येथील रहिवासी सौ. अफरीन अशफाक हुसेन (४५) या विधी शिक्षण घेत असून सध्या वसईतील एका विधी कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक १७फेब्रुवारी २०२६ रोजी वसई (प.) येथील श्री धन्वंतरी औषधी केंद्र, शॉप क्र. १, हॅपी पॅलेस सोसायटी, दीनदयाल नगर येथून "एरंड भृष्ट हरितकी पावडर" हे औषध खरेदी केले.

सदर औषधाचे उत्पादन दिनांक फेब्रुवारी २०२३ आणि मुदत समाप्ती दिनांक जानेवारी २०२५ असा नमूद आहे. मात्र मुदत संपल्यानंतरही हे औषध विक्रीस ठेवून ग्राहकाला देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

औषधाची कमाल किरकोळ किमत (एमआरपी) ८० रुपये होती. हुसेन यांनी औषध सेवन केल्यानंतर त्यांना तीव्र जुलाब व उलट्यांचा त्रास सुरू झाला. प्रकृती बिघडल्याने त्यांना १८ फेब्रुवारी २०२६ रोजी वसई महानगरपालिका रुग्णालय येथे उपचार घ्यावे लागले. या घटनेमुळे काही काळ त्यांची प्रकृती अस्वस्थ राहिल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

या प्रकरणी त्यांनी पालघर जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाच्या सहाय्यक आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत संबंधित मेडिकल स्टोअरविरुद्ध गुन्हा नोंदवून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित औषधाचा नमुना जप्त करून अधिकृत प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे आणि दोषींविरुद्ध तात्काळ गुन्हा नोंदविण्याची मागणीही करण्यात आली आहे. प्रकृती अस्वस्थतेमुळे तक्रार दाखल करण्यास विलंब झाल्याची नोंद तक्रारीत करण्यात आली आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये अधिक दक्षता घेण्याची गरज व्यक्त होत आहे. अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाची गांभीयर्ने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## जिल्ह्यात होळीनंतर तापमानात मोठ्या वाढीची शक्यता...



■वसई। प्रतिनिधी,

पालघर जिल्ह्यात पुढील काही दिवसांत हवामानात मोठे बदल होणार असून शेतकर्यांनी आपल्या पिकांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा कृषी हवामान केंद्र, कोसबाड हिल यांच्यातर्फे करण्यात आले आहे. प्रादेशिक हवामान विभाग, मुंबई यांनी दिलेल्या अंदाजानुसार,पालघर जिल्ह्यात पुढील तीन दिवस उष्ण व दमट वातावरण राहील. त्यानंतर ३ आणि ४ मार्च म्हणजेच होळीनंतर तापमानात अधिक वाढ होऊन कमाल तापमान ३४ ते ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.वाढत्या उष्णतेमुळे फळबागा, उन्हाळी पिके आणि रोपवाटिकांमधील बाष्पीभवनाचा वेग वाढणार असून, पिकांना पाण्याचा ताण बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सकाळी जास्त आर्द्रता आणि दुपारी वाढणारे तापमान यामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव जलद गतीने होऊ शकतो. विस्तारित श्रेणी अंदाजानुसार, कोकण विभागात ५ ते ११ मार्च दरम्यान कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त, तर किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

## २ महिन्यांत या पट्ट्यात २८ जणांचा बळी

### मिरा रोड ते वैतरणा या दरम्यान रेल्वे प्रवास धोकादायक

■वसई। प्रतिनिधी,

मुंबईकडे ये-जा करणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या आणि लोकल गाड्यांतील प्रचंड गर्दी यामुळे पश्चिम रेल्वेच्या मिरा रोड ते वैतरणा या दरम्यान आपघातांची मालिका सुरूच आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांत या पट्टूयात २८ जणांचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

याशिवाय काही प्रवासी वेळ वाचवण्यासाठी पादचारी पूलाचा वापर न करता रेल्वे रुळ ओलांडून धावत जातात. अशा वेळी भरधाव वेगाने येणाऱ्या एक्सप्रेस गाड्यांची धडक बसून गंभीर अपघात होतात. मागील दोन महिन्यांत मृत्यू झालेल्या २८ जणांपैकी २४ जणांची ओळख पटली आहे, तर चार जणांच्या नतेवाईकांचा अद्याप शोध लागलेला नाही. तसेच १८ जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

रेल्वे पोलिसांच्या मते, काही अपघात निष्काळजीपणामुळे घडत आहेत. प्रवाशांनी नियम पाळले नाही, घाई केली किंवा धोकादायक पद्धतीने प्रवास केला तर अपघाताची शक्यता वाढते. अपघात रोखण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

दरम्यान, वसई-विरार परिसरात विशेष जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. लोहमार्ग पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बल यांच्या संयुक्त विद्यमाने नालासोपारा स्थानकात प्रवाशांना रांगेत उभे राहून लोकलमध्ये चढण्याचे मार्गदर्शन केले जात आहे. तसेच गर्दीच्या वेळी सुरक्षित प्रवास कसा करावा, रेल्वे नियमांचे पालन का महत्वाचे आहे, याबाबत माहिती दिली जात आहे. प्रशासनाने प्रवाशांना घाईगडबड टाळून सुरक्षितपणे प्रवास करण्याचे आवाहन केले आहे. वाढती गर्दी आणि निष्काळजीपणा यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी प्रवाशांनी स्वतःहूनही जबाबदरीने वागणे आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



वसई-विरार, मिरा-भाईंदर परिसरात गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले आहे. त्यामुळे विरार, नालासोपारा, वसई, नायगाव, भाईंदर आणि मिरा रोड या स्थानकांतून दररोज हजारो प्रवाशांना कामासाठी मुंबईला प्रवास करावा लागतो. जागा नसतानाही ट्रेन पकडण्यासाठी प्रवाशांची धावपळ सुरू असते. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी लोकल गाड्यांमध्ये पाय ठेवायलाही जागा नसते. अशा परिस्थितीत अनेक प्रवासी दरवाजाला लटकून किंवा पायऱ्यांवर उभे राहून प्रवास करतात. त्यामुळे तोल जाऊन पडण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

## मालेगाव हादरले! ७ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार...




#### बुलढाण्यात गतिमंद मुलीवर अत्याचार

बुलढाणा जिल्ह्यामध्ये एक खळबळजनक घटना समोर आली असून मोताळा तालुक्यातील बोराखेडी शिवारामध्ये एका १७ वर्षीय अल्पवयीन गतिमंद मुलीचा मृतदेह विवस्त्र अवस्थेत नदीच्या पाण्यावर तरंगताना आढळला... यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली असावी का?, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. मोताळा येथील प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागच्या गिट्टी खदान जवळ असलेल्या परिसरात घटना उघडकीस आलीय... याप्रकरणी आता बोराखेडी पोलिसांनी तपास सुरु केलं असून शवविशेदन तसेच तांत्रिक बाबींच्या आधारे तपास केलाय जात आहे... गतिमंद मुलगी दोन दिवसापासून घरातून बेपत्ता होती... मात्र सर्वत्र शोध घेत असताना तिचा मृतदेही आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

■मालेगाव। प्रतिनिधी,

मालेगाव शहर पुन्हा एकदा हादरले आहे. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे एका तरुणाने ७ वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. २० वर्षीय अरीब अहमद अतिक अहमद राहणार अंजुमन चौक, मालेगाव या संशयित नराधम तरुणाला पोलिसांनी पकडलं आहे. एका ७ वर्षीय बालिकेवर छत्रपती शिवाजी महाराज टाऊन हॉल जुन्या महानगर पालिकेसमोर ती बालिका लहान मुल - मुलींसोबत खेळत असताना त्याने तिचे वर लैंगिक अत्याचार केले. या घटनेची माहिती समजताच तेथील स्थानिकांनी त्याला वेळीच पकडून किल्ला पोलिस ठाण्यात आणून पोलिसांच्या स्वाधीन केले.

त्याचेवर सि.सि.टी.एन.एस.गु.र.नं २८/२०२६ इठर कायदा कलम ७४, ७५ सह बालकाचे लैंगिक सरंक्षण कायदा २०१२ चे कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान गेल्या दोन दिवसांपूर्वी देखील सदर या संशयित नराधम आरोपीने एका लहान बालकावर देखील असेच गैरकृत्य केल्याचे तेथील त्या बालकाच्या नातेवाईकांनी सांगितले. सदर घटनास्थळ टाऊन हॉल परिसर, तुडक्या भिंती इमारती, संरक्षक गेट नीट नसणे यामुळे हा परिसर नेहमीच नशा करणाऱ्यांचा अड्डा बनला असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे येथे वेळीच महानगर पालिका आणि पोलिस प्रशासनाने मिळून यावर अंकुश आणला पाहिजे अशी नागरिकांकडून मागणी केली जात आहे. या प्रकरणी आता संशयित आरोपीला उद्या न्यायालयात हजर करण्यात येईल आणि त्याला किती दिवसांची पोलिस कोठडी मिळेल तसेच त्या पोलिस कोठडीवर पोलिस आरोपी विरुद्ध कसे पुरावे गोळा करतील हे बघणे महत्वाचे ठरेल.



#### पोलिसांनी दिली माहिती

या व्हिडिओमध्ये कथित बाबा मल्लिकार्जुन मुत्या एका मठात संबंधित अल्पवयीन मुलीशी बोलत असल्याचं दिसून येत आहे आणि त्यावेळी तिच्यासोबत अश्लील कृत्य करताना दिसत आहे. आयोगाच्या सूचनांनुसार, जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी त्या आश्रमाला भेट दिली आणि मुलीसह तिच्या पालकांचे जबाब नोंदवले. आपणच हा व्हिडीओ रेकॉर्ड केल्याचा तिच्या पालकांनी दावा केला. समुपदेशनानंतर, बाल कल्याण समितीने असं नोंदवलं की व्हिडिओमध्ये मुलगी अस्वस्थ दिसत होती आणि त्यांनी गुन्हा दाखल करण्याची शिफारस केली.

## स्वयंभू बाबाचे अश्लील कृत्य! मुलीच्या आई-वडिलांनीच व्हिडीओ रेकॉर्ड केला



■मुंबई। प्रतिनिधी,

कर्नाटकच्या यादगीर जिल्ह्यातून एक संतापजनक प्रकरण समोर आलं आहे. येथील स्वयंभू बाबा मल्लिकार्जुन मुत्या एका व्हिडीओमुळे चर्चेत आल्याचं वृत्त आहे. स्वतःला बाबा म्हणवणारी ही व्यक्ती सोशल मीडियावर व्हायरल व्हिडीओत एका अल्पवयीन मुलीसोबत अश्लील कृत्य करताना दिसत आहे. याप्रकरणी, कथित बाबवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका अल्पवयीन मुलीसोबत अश्लील कृत्य केल्याचा आरोपाखाली पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे.

एका व्हायरल व्हिडिओमध्ये, कथित बाबा एका ७ वर्षाच्या मुलीसोबत अश्लील कृत्य करताना दिसत आहे. कर्नाटक राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली असून यादगीर जिल्हा पोलिसांना आरोपी बाबवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित घटना १९ फेब्रुवारी रोजी यमनुरप्पा मुत्या मठ असलेल्या मेहल रोजा गावात घडली. मूळची सोलापूरची राहणारी ही अल्पवयीन मुलगी तिच्या कुटुंबासह त्या मठात गेली होती.

दरम्यान, यादगीर पोलिसांनी आरोपी बाबला नोटिस जारी केली असून पीडित मुलीसह तिच्या आई-वडिलांचे जबाब नोंदवले गेले आहेत. तसेच, व्हिडीओमध्ये मुलगी अस्वस्थ असल्याचं दिसत असून काउन्सलिंगनंतर चाइल्ड वेलफेअर कमिटीने एफआयआरची शिफारस केली. पोलिसांनी याप्रकरणी पोक्सो ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## ९ वर्षीय मुलीच्या गुप्तांगाला हळद-कुंकू लावून ८३ वर्षीय नराधमाची अघोरी पूजा... नंतर अत्याचार

■बीड। प्रतिनिधी,

शाळेत जाणाऱ्या अवघ्या ९ वर्षाच्या बालिकेला चॉकलेटचे आमिष दाखवून तिच्यावर अघोरी पूजा करत अत्याचार करणाऱ्या ८३ वर्षीय नराधम आरोपीचा जामीन अर्ज केज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. समाजात अंधश्रद्धा पसरवणारे आणि चिमुरडीवर घृणास्पद कृत्य करणाऱ्या अशा गुन्हेगाराला जामीन देणे समाजासाठी घातक असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एका गावात ही धक्कादायक घटना २८ जानेवारी २०२६ रोजी घडली होती. बाबुराव केरबा निरडे (वय ८३ वर्ष) याने पीडित बालिकेला गाठले आणि चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या घरात बोलावले. सुरुवातीला तिला हात-पाय दाबायला लावून नंतर तिचे कपडे काढले. त्यानंतर आरोपीने पीडितेच्या खासगी भागाला हळद-कुंकू लावून, अंगावरून लिंबू फिरवून आणि तोंडातून मंत्रोच्चार करून अत्यंत किळसवाणी 'अघोरी पूजा' केली आणि तिच्यावर अत्याचार केला. या अमानवीय प्रकारामुळे संपूर्ण जिल्हा हादरून गेला होता.

पीडित बालिकेच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून दिंद्रुड पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध बलात्कार (भारतीय न्याय संहिता/IPC) पोक्सो कायदा, जादुटोणा विरोधी कायदा या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्याने जामिनासाठी केज येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज केला होता. सदर अर्जावर सुनावणी करताना माननीय सत्र न्यायाधीश श्रीमती आर. के. शेख यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेतले. "आरोपीने केलेले कृत्य हे केवळ अत्याचार नसून समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेत नेणारे आणि अत्यंत घृणास्पद आहे," असे नमूद करत २६ फेब्रुवारी २०२६ रोजी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. आर. बी. बिरंगळ यांनी प्रभावी युक्तिवाद केला, त्यांना सहाय्यक सरकारी वकील ॲड. डी. बी. इंगळे यांनी मोलाचे सहकार्य केले.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मोदींचा फलदायी इस्रायल दौरा



**मोदी यांनी आपल्या दौऱ्यात काही प्रश्नांवर ठोस, तर काही विषयांवर संतुलित भूमिका मांडली. 'दहशतवादाच्या विरोधात दुटप्पी भूमिका घेता येणार नाही,' असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इस्रायल दौरा हा दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये पुढचे पाऊल टाकणारा ठरला. सध्याच्या गढूळ आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये पार पडलेल्या या दौऱ्याने शांतता आणि आखातातील संतुलनाचे महत्त्व दृगोच्चर होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एकीकडे गाझापट्टीतील दीर्घ काळ लांबलेले युद्ध आणि दुसरीकडे अमेरिका-इराण यांच्यातील युद्धस्थितीचे दाटून आलेले ढग, या पार्श्वभूमीवर भारतीय पंतप्रधानांच्या दौऱ्यास मोठे महत्त्व प्राप्त झाले होते. या वेगवेगळ्या तणावांमध्ये भारत नेमकी कोणती भूमिका घेणार, याबाबत अनेक देशांना उत्सुकता होती. भारत आणि इस्रायलमधील विरोधकांकडून हा दौरा आणि मोदींचे भाषण यांवरून झालेला विरोध हा या विषयावरील संमिश्र भावनांची साक्ष देतो. मात्र, हे वादाचे विषय वगळता विविध क्षेत्रांमधील दोन्ही देशांचे सहकार्य या दौऱ्याने वाढीस लागेल, अशी आशा आहे. विशेषतः भारत-इस्रायलमधील मुक्त व्यापार कराराचे सूतोवाच, हे मोदी यांच्या भेटीचे फलित म्हणावे लागेल. इस्रायल आणि पॅलेस्टाइन यांच्या संघर्षात पूर्वीपासून भारत पॅलेस्टिनचा पक्ष घेत आहे. तीन दशकांपूर्वी बदलत्या परिस्थितीत भारताने यामध्ये संतुलित भूमिका घेतली. विशेषतः संरक्षण आणि कृषी अशा क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांचे सहकार्य वाढीस लागले असून दहशतवादाचा सामना करताना भारताला वेळोवेळी इस्रायलचा सक्रिय पाठिंबा लाभला आहे. अपेक्षेप्रमाणे या दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. त्यामध्ये विज्ञान-तंत्रज्ञानातील संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम फिजिक्स आणि दुर्मीळ खनिजे अशा विषयांमध्ये सहकार्य, वस्तू व सेवांची देवाणघेवाण, सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करणे आणि बौद्धिक स्वामित्वाच्या नियमांसारखे व्यापारातील अडथळे दूर करणे अशा मुद्द्यांचा समावेश आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील सहकार्यवाढीसाठी मंत्रालय पातळीवर समिती, आर्थिक संवाद आणि कृषी संशोधनाबाबत फेलोशिप, याबरोबरच येत्या काळात ५० हजार भारतीयांना इस्रायलमध्ये प्रवेश आणि शैक्षणिक सहकार्याचे व्यासपीठ आणि संसदीय मैत्री गटाची स्थापना अशी पावले उचलण्यात येणार आहेत. संरक्षण क्षेत्रात प्रगत इस्रायली तंत्रज्ञानाचा भारताला वेळोवेळी उपयोग झाला असल्याने या दौऱ्यात त्याविषयी चर्चा झाली. त्यासह भारतीय 'युनिफाइड पेमेंट इंटरफेस'चा (यूपीआय) इस्रायलमध्ये वापराचा मार्गही खुला झाला आहे. दुसरीकडे गाझामधील मानवाधिकार उल्लंघनावरून जगभरात टीकेचे धनी बनलेले इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना भारतासारख्या देशाचा नैतिक पाठिंबा या दौऱ्यातून मिळाला असून भारताच्या मोठ्या बाजारपेठेतील त्यांचा मार्गही सुकर होणार आहे. एकीकडे दहशतवादविरोधी लढ्यातील सहकारी इस्रायलशी सहकार्य आणि दुसरीकडे इस्रायलशी उभे वैर असलेल्या आखाती देशांशी पूर्वीपासून असलेले मैत्रिपूर्ण संबंध राखणे, या पार्श्वभूमीवर सन २०१७नंतर झालेल्या पंतप्रधानांच्या इस्रायल भेटीमध्ये उत्सुकता होती. मोदी यांनी 'हमास' च्या हल्ल्यातील बळींच्या कुटुंबीयांशी सहवेदना व्यक्त केली; तसेच गाझा शांतता मंडळाच्या पावलांचे समर्थनही केले. मात्र, गाझामध्ये इस्रायलकडून करण्यात आलेल्या नरसंहारामध्ये ७२ हजार जणांचा बळी गेला असून, त्यामध्ये महिला व लहान मुलांचाही समावेश आहे. त्याबाबत मोदी यांनी स्पष्ट उल्लेख केला नाही. त्याबाबत उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. नेतान्याहू यांच्या विरोधकांनी मोदी यांच्या भाषणाचा सभात्याग केला; तसेच भारतातही काँग्रेससह विरोधी पक्षांनी सरकारवर टीका केली आहे. 'गाझामध्ये हजारो पॅलेस्टिनींना उपासमारीची शिक्षा देणाऱ्या राजवटीचे समर्थन करणारा देश म्हणून भारताकडे पाहिले जाऊ नये,' अशी अपेक्षा विरोधकांकडून व्यक्त झाली आहे. अर्थात, जगातील अनेक संघर्षांमध्ये भारताने 'शांततेचा पक्ष' निवडला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. भारताने पॅलेस्टाइनमध्ये हाती घेतलेले २१ कोटी डॉलरचे प्रकल्प हे या संतुलनाचे साक्षीदार आहेत. सौदी अरेबिया आणि कतारसारखे देश भारताचे विश्वासू भागीदार असून, लाखो भारतीयांना आखाती देशांमध्ये रोजगार मिळत आहे. या देशांनीही भारताच्या भूमिकेबाबत आक्षेप घेतलेला नाही, हे महत्त्वाचे. इराणमधील चाबहार बंदरासह भारताचे प्रदेशातील हितसंबंध कळीचे आहेत. इराण व अमेरिकेतील तणाव आणि त्यातील इस्रायलची सक्रिय भूमिका यांचाही विचार महत्त्वाचा आहे. त्यामुळेच दहशतवादाला ठाम विरोध, मानवाधिकारांचे रक्षण आणि इस्रायल-आखाती देशांमधील हितसंबंधांची जोपासना असे संतुलन आवश्यक आहे. केवळ 'हिंदू-मुस्लिम'सारख्या चष्म्यातून याकडे पाहणे उथळपणाचे ठरेल. पंतप्रधान मोदींनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या उपस्थितीत केलेल्या भाषणातून आय टू यू टू (भारत-इस्रायल, युनायटेड स्टेट्स-यूएई) आणि आय मॅक (भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर) प्रकल्पांसाठी सहकार्य वाढविण्याचे आवाहन केले. हे दोन प्रकल्प भारतीय व्यापाराच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाकांक्षी असे आहेत. व्यापार, गुंतवणूक सहकार्य वाढवण्यासोबतच पंतप्रधान मोदींनी ज्यू लेफ्टनंट जनरल जे.एफ.आर. जेकब यांच्याशी असलेल्या जवळीकतेचा आपल्या भाषणात उल्लेख केला. त्यातून दोन्ही देशांची भागीदारी केवळ व्यापारावर आधारित नसून धोरणात्मक आणि संरक्षण क्षेत्रातील भागीदार म्हणूनही भारत-इस्रायलचे संबंध विकसित होत असल्याचे पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले. आतापर्यंत इस्रायलकडून भारताला संरक्षण क्षेत्रात वेळोवेळी मोठी मदत झाली आहे. मिसाईल्स, ड्रोन्स, रडार्स याशिवाय अनेक संरक्षण उत्पादने भारत इस्रायलकडून घेतो. यावेळच्या दौऱ्यातही कृषी, शिक्षण, एआय, तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रांमध्ये भारताने इस्रायलसोबत महत्त्वाचे करार केले आहेत. लवकरच दोन्ही देशांमध्ये मुक्त व्यापार करार अपेक्षित आहे. एकूणच इस्रायलच्या बाजूने झुकणाऱ्या पंतप्रधान मोदींच्या भूमिकेवर विरोधक कितीही टीका करू देत त्यांचा नुकताच संपन्न झालेला दौरा भारतासाठी फलदायी ठरावा एवढीच अपेक्षा.

# रोख ते रोखठोक!




आपल्याकडे डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढत असले तरी रोखीच्या व्यवहारांचे प्रमाण लक्षणीय पद्धतीने कमी झालेले नाही. आर्थिक, प्रादेशिक व सामाजिक विषमतेने ग्रासलेल्या आपल्या देशासाठी रोखीच्या व्यवहारांपासून 'रोखठोक' (चोख व पारदर्शक) व्यवहारांपर्यंतचा प्रवास निश्चितच सोपा नाही.

गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये, भारतात डिजिटल व्यवहार प्रणालीचा मोठ्या प्रमाणात स्वीकार झालेला दिसून येतो. डिजिटल व्यवहार म्हणजे रोख रकमेचा ('नोटा किंवा नाणी' यांचा) वापर न करता, इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे, जसे की मोबाइल, कम्प्युटर किंवा इंटरनेटच्या मदतीने पैशांचे हस्तांतरण करणे. या व्यवहारांत यूपीआय, नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्डस, डिजिटल वॉलेट्स इत्यादींचा समावेश होतो. या व्यवहारांचा मोठा फायदा म्हणजे ते त्वरित व सुरक्षितपणे पूर्ण करता येतात. पिन, ओटीपी आणि एंक्रिप्शन तंत्रज्ञानामुळे हे व्यवहार सुरक्षित असतात. गेल्या काही वर्षांत, विशेषतः करोना साथीच्या काळापासून आपल्या देशात या डिजिटल व्यवहारांत झपाट्याने वाढ झाली. फक्त शहरांमधूनच नव्हे तर अगदी ग्रामीण भागातही आज अनेक किरकोळ (रिटेल) व्यवहार या डिजिटल माध्यमांद्वारे होताना दिसतात. रिक्षावाल्यांना वा भाजी-फळे विकणाऱ्यांना पैसे देणे असो, की मोठाल्या मॉल्समधून खरेदी करणे असो की विजेची, गॅसची बिले देणे असो, आज अनेकांची प्रथम पसंती डिजिटल पेमेंटलाच दिसून येते.

भारतीय रिझर्व्ह बँक दर सहा महिन्यांनी, भारतासाठी डिजिटल पेमेंट निर्देशांक प्रसिद्ध करते. १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या निर्देशांकाचे सप्टेंबर, २०२५ मधील मूल्य ५१६.७६ एवढे होते, जे मार्च, २०१८ मध्ये १०० होते. म्हणजेच गेल्या सात-आठ वर्षांत डिजिटल व्यवहारांचे प्रमाण पाच पटीहून अधिक वाढलेले आहे. आता या वेगाने एखाद्या देशातील डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढत असेल, तर तेथील रोखीच्या व्यवहारांचे प्रमाण लक्षणीय पद्धतीने कमी व्हायला पाहिजे, अशी सर्वसामान्यपणे अपेक्षा असते. पण तसे होताना दिसत नाही आहे. रिझर्व्ह बँकेच्या डेटाप्रमाणे, भारतीय अर्थव्यवस्थेतील 'प्रचलित चलन' (करन्सी इन सक्युर्लेशन), जानेवारी ३१, २०२६ पर्यंत रु. ४० लाख कोटी एवढे (गेल्या वर्षीच्या तुलनेत ११ टक्क्यांनी) वाढले आहे. या 'प्रचलित चलना'तील वाढ २०२१-२२ मध्ये ९.८१ टक्के होती, जी २०२२-२३ मध्ये ७.८१ टक्के झाली व २०२३-२४ मध्ये ३.९३ टक्केपर्यंत घसरली. मात्र २०२४-२५ पासून 'प्रचलित चलना'तील वाढीने पुन्हा जोम धरला असून, ही वाढ २०२४-२५ मध्ये ६.०७ टक्के झाली, तर चालू वित्तीय वर्षात (२०२५-२६ मध्ये), जानेवारीपर्यंत ही वाढ तब्बल ११ टक्के इतकी झाली.

'केअर एड्ज रेटिंग' या रेटिंग एजन्सीच्या अहवालाप्रमाणे २०२५-२६ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीत खासगी क्षेत्राच्या एकूण खर्चातील रोखीच्या व्यवहारांचे प्रमाण तब्बल ५० टक्के इतके वाढलेले होते.

आता आपल्या देशात ही उलटी गंगा कशामुळे वाहू लागली आहे, ते समजून घेणे गरजेचे आहे.

**१) ग्रामीण भागांची आर्थिक वाढ :** गेल्या दोन वर्षांत पाऊसपाणी व पिके चांगली झाल्यामुळे, ग्रामीण भागांतील उत्पन्ने व खर्च तुलनेने वाढले आहेत. अजूनही निम्न-शहरी व ग्रामीण भागांत रोखीचे व्यवहार बऱ्यापैकी प्रचलित आहेत. पैशांची प्रत्यक्ष देवाण-घेवाण करणे ग्रामीण नागरिकांना अधिक सोयीचे व सुरक्षित वाटते. या भागांतील डिजिटल सुविधांचा तुटवडा व कमी प्रमाणातील आर्थिक साक्षरता यास कारणीभूत असू शकतात. तसेच अनेक शेतकरी हे व्यापाऱ्यांकडून रोख पैसे घेण्यास प्राधान्य देतात; कारण बऱ्याच वेळा त्यांनी सावकार/ दलालांकडून जी कर्जे घेतली असतात ती रोख स्वरूपात असतात. यांमुळेच आज अनेक बँका ग्रामीण भागांत नवनवीन एटीएम मशीन्स उघडत आहेत. गेल्या दोन वर्षांत ग्रामीण भागांमध्ये एटीएम मशीन्समधून पैसे काढण्याचे प्रमाण जबरदस्त वाढले आहे, जे तिथली आर्थिक परिस्थिती तुलनेने सुधारल्याचे लक्षण असू शकते. पण याचा परिणाम अर्थव्यवस्थेमधील रोखीचे व्यवहार वाढण्यावर झाला आहे.

**२) व्याज-दरांतील घसरण :** २०२५-२६ या वित्तीय वर्षांत, जलद वेगाने घसरलेल्या व्याजदरांमुळे, कमी उत्पन्न असलेल्या अनेक लोकांनी, आपल्या मिळकतीचे पैसे बँकांमध्ये न ठेवता, स्वतःसोबत रोखीच्या स्वरूपात ठेवणे सुरू केले आहे. जर व्याजातून मिळणारे पैसे विशेष नसतील तर बँकेत का ठेवा, असा विचार करून अनेकांनी नगदी पैसे जवळ ठेवण्यास सुरुवात केली आहे. अडीअडचणीला लगेच वापरता येतील, अशी सोय त्यात बघितली जाते. गेल्या एक-दोन वर्षांत याचा परिणाम बँकांमधील ठेवींची वाढ मंद होण्यावर झालेला दिसून आला आहे. यामुळे अर्थव्यवस्थेतील प्रचलित चलन मात्र वाढलेले दिसते.

**३) जमीन/इमारतींच्या व्यवहारातील वाढ :** अजूनही अशी काही क्षेत्रे आहेत जिथे 'औपचारिकीकरण' (फॉर्मलायझेशन) पुरेशा प्रमाणात झालेले नाही. उदाहरणार्थ, जमीन व इमारतींचे व्यवहार. विशेषतः जमिनी वा इमारतींच्या दुय्यम विक्री/ खरेदी नोंदणी व्यवहारांमध्ये, मत्तेच्या किंमती प्रत्यक्षापेक्षा कमी दाखविल्या जातात व उर्वरीत रक्कम मोठ्या प्रमाणात रोखीच्या स्वरूपात दिली जाते. अनेकवेळा हे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षाही अधिक असते. हे असे 'काळे' पैसे अर्थव्यवस्थेतील 'प्रचलित चलन' वाढवत असतात. सध्या झपाट्याने वाढलेले 'प्रचलित चलन' हे अर्थव्यवस्थेतील 'जमिनी व इमारतींचे दुय्यम व्यवहार' वाढल्याचे लक्षण मानता येऊ शकते.

**४) जीएसटीचे अनुपालन :** गेल्या एक-दोन वर्षांत जीएसटीचे अनुपालन सुधारावे म्हणून अनेक राज्यांमधून लघु उद्योजकांना, विक्रेत्यांना तसेच पुरवठादारांना नोटिसा पाठविण्यात आल्या. कारण या उद्योजकांनी/व्यापाऱ्यांनी यूपीआय वापरून जो व्यवसाय केला होता, त्यामुळे त्यांनी व्यवसायातून कमाविलेल्या उत्पन्नाचे अचूक मोजमाप करणे शक्य झाले. 'जीएसटी'च्या कचाट्यात न अडकण्यासाठी पुन्हा या उद्योजकांनी यूपीआय वापरणे सोडून, रोखीच्या व्यवहारांना स्वीकारले आहे. याचा अनुभव आपण सगळेच सतत घेत असतो. जसजसे जीएसटीचे अनुपालन सुधारण्याचे प्रयत्न जोमाने सुरू झाले तसतसे अनेक छोट्या-मोठ्या उद्योजकांनी 'कच्ची पावती' देऊन नगदी पैशांत वस्तू विकणे पुन्हा सुरू केले आहे. यातून देखील 'प्रचलित चलन' वाढण्यास मदत होते आहे.

**५) प्रादेशिक विषमता :** भारतातील निरनिराळ्या राज्यांमधील आर्थिक विषमतेमुळे, या राज्यांतील रोखीच्या व्यवहारांचे प्रमाण भिन्न असते. उदाहरणार्थ, बिहार, नवी दिल्ली (लघु उद्योगांचे प्राबल्य), उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, छत्तीसगढ या राज्यांत अजूनही रोखीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात चालतात; तर महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगण या राज्यांत डिजिटल माध्यमांद्वारे पैशांचे व्यवहार तुलनेने अधिक प्रमाणात होतात. जेव्हा रोखीच्या व्यवहारांत प्राबल्य असलेल्या राज्यांतील आर्थिक उद्योगांना गती प्राप्त होते, तेव्हा एकूण देशासाठीचे 'प्रचलित चलन' वाढीस लागते.

**६) निवडणुका :** कुठल्याही निवडणुकांच्या काळात सर्वच राजकीय पक्ष प्रत्यक्ष पैसे-वाटप करत असल्यामुळे, 'प्रचलित चलन' वाढीस लागते.

**७) स्थिर नाणी :** एकूण जगातील 'स्थिर नाण्यांचा' वाढता वापर हे आणखी एक कारण असू शकते. स. सी. गर्ग (भारताचे माजी वित्त सचिव) यांच्या मते, आज जरी आपल्या देशाच्या केंद्रीय बँकेने म्हणजेच रिझर्व्ह बँकेने स्थिर नाण्यांना 'रुपया'चा (भारतीय चलनाचा) पाठिंबा दिला नसला तरीही अमेरिका, चीन वगैरे देशांनी स्थिर नाण्यांना वैधता (कायदेशीर मान्यता) दिली आहे. आज या देशांतील अनेक खासगी उद्योग 'स्थिर नाणी' बनवत आहेत, ज्यांना या देशांतील चलनाचा पाठिंबा आहे. अशा प्रकारची स्थिर नाणी तिथल्या अधिकृत चलनाला पर्याय म्हणून वापरली जात आहेत. जरी रिझर्व्ह बँकेचा स्थिर नाण्यांना पाठिंबा नसला तरीही भारतीय लोक स्थिर नाण्यांचे जाळे पैशांचे आंतरराष्ट्रीय हस्तांतरण करण्यासाठी वापरताना दिसतात.

परदेशांत स्थायिक झालेले भारतीय लोक, भारतात पैसे पाठविण्यासाठी 'स्थिर नाणी' वापरतात, तर भारतीय लोक परदेशातील खर्चासाठी - पर्यटन किंवा शिक्षण इत्यादींसाठी त्यांचा वापर करताना दिसतात. 'स्थिर नाण्यांचे जाळे' हा पूर्वीच्या 'हवाला' व्यवहारांसाठीचा पर्याय ठरत आहे. हवाला ही एक बेकायदा, कागदपत्रविरहित अशी गुप्त पद्धत आहे, जी सहसा काळा पैसा लपवण्यासाठी किंवा सीमापार पैशांच्या व्यवहारांसाठी वापरली जाते. सद्य परिस्थितीत ही शक्यता नाकारता येत नाही, की जसजसा स्थिर नाण्यांचा वापर वाढत जाईल तसतसे परदेशांमधून अधिकृतपणे होणारे पैशांचे हस्तांतरण कमी होत जाईल. तसेच उदारीकृत रेमिटन्स योजनेचे महत्त्वही कमी होईल.'

**उपाययोजना**

देशातील डिजिटल व्यवहारांचे एकूण प्रमाण वाढविण्यासाठी व रोखीच्या व्यवहारांचे प्रमाण कमी करण्यासाठी काय करता येईल?

सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे छोट्यामोठ्या उद्योगांसाठी वा नागरिकांसाठी कुठल्याही प्रकारच्या कठोर शिक्षा - आर्थिक वा करांच्या संदर्भातील - टाळल्या पाहिजेत. अन्यथा परिणाम उलटाच होतो, हे अनेकदा दिसून आले आहे.


जमिनी वा इमारतींच्या व्यवहारांवर जी अवाच्यासवा स्टॅम्प ड्यूटी व कॅपिटल गेन्स टॅक्स लावण्यात आले आहेत ते कमी केले पाहिजेत. तसे केल्याने काळ्या पैशांत व्यवहार करण्याचे प्रलोभन कमी होऊ शकते. यामुळे महासुलात जी तूट निर्माण होईल ती भरून काढण्यासाठी अती-श्रीमंत लोकांच्या मत्तेवर कर लावणे श्रेयस्कर ठरेल.

तसेच लघु उद्योजकांना / विक्रेत्यांना जर वेळच्यावेळी त्यांनी 'कच्च्या माला'वर भरलेल्या कराची भरपाई देण्यात आली (इनपुट टॅक्स क्रेडिट) तर त्यांना नोंदणी करण्यासाठी, वैध इनव्हॉइस जारी करण्यासाठी तसेच विक्रीचा प्रामाणिक अहवाल देण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. यामुळे रोखीचे व्यवहार करण्याची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते.

रोखीचे व्यवहार कमी करण्यासाठी आणि डिजिटल व्यवहार वाढवण्यासाठी, भारताने लहान व्यापाऱ्यांना यूपीआयवर शून्य व्यापारी सवलत दर दिला पाहिजे. डिजिटल व्यवहारांबाबत विश्वास निर्माण होण्यासाठी सायबर सुरक्षा मजबूत केली पाहिजे. तसेच ग्रामीण/ निम्नशहरी भागांत डिजिटल पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. याबाबतीतल्या धोरणांमध्ये डिजिटल पेमेंटसाठी कर प्रोत्साहने, यूपीआय आणि क्यूआर कोडचा प्रचार, आणि डिजिटल साक्षरतेचा प्रसार यांना प्राधान्य दिले पाहिजे.

आर्थिक, प्रादेशिक व सामाजिक विषमतेने ग्रासलेल्या आपल्या देशासाठी रोखीच्या व्यवहारांपासून 'रोखठोक' (चोख व पारदर्शक) व्यवहारांपर्यंतचा प्रवास निश्चितच सोपा नाही, हे लक्षात घ्यायला हवे व त्यानुसार पावले टाकायला हवीत. त्यास पर्याय नाही.

# ट्रम्प टेरिफला सर्वोच्च धक्का



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे आयात-शुल्क धोरण जमीनदोस्त झाले आहे. गेले वर्षभर भारताला वेठीस धरणाऱ्या ट्रम्प यांच्यावर दबाव आणण्याची संधी आता भारताकडे आहे.

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ युद्धाला वेसण घालण्याचा जाहीर केलेला निवाडा अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायायलाच्या संपूर्ण नऊ सदस्यांच्या पीठाने सहा विरुद्ध तीन असा बहुमताने निर्णय देताना कर लागू करण्याचे सार्वभौमित्व संसदेकडे (अमेरिकी कॉंग्रेस) असल्याचा निवाळा दिला आहे. विधिमंडळ, कार्यपालिका व न्यायपालिका या लोकशाहीच्या तीन केंद्रीय संस्थांपैकी केवळ विधिमंडळाला कर लागू करणे, नष्ट करणे आणि कमी-जास्त करण्याचे सर्वांगीण अधिकार असल्याचे अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

कर आकारणीच्या प्रकारात देशाच्या आयात-निर्यात मालावरील शुल्कांचा समावेश सर्वोच्च न्यायालयाने केला आहे. त्यामुळे, अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी, म्हणजे कार्यपालिकेने, एप्रिल २०२५ मध्ये वटहुकुमाद्वारे सर्व देशांवर लागू केलेले आयात शुल्क रद्दबातल ठरले आहे. हा निवाडा देर्णाया सहा न्यायाधीशांपैकी तीन न्यायाधीश रिपब्लिकन विचारसरणीचे असल्यामुळे या निर्णयाला प्रचंड महत्त्व आले आहे. या तीन रिपब्लिकन न्यायाधीशांमध्ये जॉर्ज बुश (कनिष्ठ) यांच्या काळात नियुक्त झालेले व सध्या सरन्यायाधीश असलेले जॉन जी रॉबर्ट्स आणि ट्रम्प यांच्या प्रथम कारकिर्दीत नियुक्त करण्यात आलेल्या दोन न्यायाधीशांचा समावेश आहे.

मागील वर्षभराच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने काही मोजके अपवाद वगळता अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये ट्रम्प प्रशासनाला हिरवा कंदील दिलेला आहे. मात्र, आयात-शुल्क प्रकरणातील निर्णयातून दोन बाबी स्पष्ट होतात. एक, जिथे अमेरिकी राज्यघटनेने संस्थांचे अधिकार निश्चित केले आहेत, तिथे या अधिकारांच्या पायमल्लीकडे न्यायपालिका कानाडोळा करू शकत नाही. दोन, ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणावरून रिपब्लिकन गटात दुफळी आहे. अन्यथा, तीन रिपब्लिकन न्यायाधीशांनी एवढी स्पष्ट भूमिका घेतली नसती. सर्वोच्च न्यायालयातील अन्य तीन रिपब्लिकन न्यायाधीशांनी आयात-शुल्क आकारण्यातील ट्रम्प यांचे अधिकार मान्य केले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या काही दिवसांपूर्वी रिपब्लिकन गटातील मतभेदांचे दर्शन अमेरिकी कॉंग्रेसचे कनिष्ठ सभागृह असलेल्या हाऊस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हजमध्ये सुद्धा घडले होते. कॅनडावर अतिरिक्त आयात शुल्क लादण्याच्या निर्णयाला सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाच्या सहा प्रतिनिधींनी विरोध केल्याने तो ठराव बारगळला होता. अमेरिकेत घेण्यात आलेल्या जनमत चाचण्यांमध्ये जवळपास ३० टक्के रिपब्लिकन मतदारांनी ट्रम्प यांच्या आयात-शुल्क धोरणाबाबत नापसंती दर्शवली आहे. अमेरिकेत या वर्षाअखेरीस हाऊस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हजची सार्वत्रिक निवडणूक आणि वरिष्ठ सभागृह असलेल्या सिनेटच्या रिक्त होर्णाया जागांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. ट्रम्प यांच्या आयात-शुल्क धोरणाबाबत रिपब्लिकन समर्थकांमध्ये एकवाक्यता न झाल्यास डेमोक्रॅटिक पक्षाला या निवडणुकांमध्ये फायदा होऊ शकतो.

अन्योन्य पद्धतीने आयात शुल्क लागू करणे हे ट्रम्प यांच्या परराष्ट्र धोरणातील सर्वात प्रमुख अस्त्र आहे. त्यामुळे, त्यांनी अपेक्षेप्रमाणे सन १९७४ च्या एका कायद्याच्या आधारे सर्व देशांवर १५ टक्के आयात-कर लागू केला आहे. या कायद्याअंतर्गत अमेरिकी राष्ट्राध्यक्ष जास्तीत जास्त १५ टक्के आयात-कर १५० दिवसांपर्यंत लागू करू शकतात. त्यापुढे, अमेरिकी कॉंग्रेसची परवानगी आवश्यक ठरते. यापूर्वी कोणत्याही राष्ट्राध्यक्षाने या कायद्याच्या आधारे आयात-कर वाढवले नव्हते. त्यामुळे, १५० दिवसांनंतर नेमके काय होणार याबाबत अनिश्चितता आहे. ट्रम्प यांची मदार या वर्षीच्या निवडणुकांवर आहे. तोवर हाऊस ऑफ रेप्रेसेंटेटिव्हजची निवडणूक होऊन ट्रम्प यांच्या पक्षाकडे बहुमत असणार की नाही हे कळेल, आणि त्यानुसार या १५ टक्के आयातकराचे भवितव्य निधारींत होईल. सध्या तरी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने ट्रम्प प्रशासनापुढे दोन मोठ्या अडचणी उभ्या ठाकल्या आहेत.

**वसुलीचा परतावा होणार का?**

यातील पहिली अडचण म्हणजे, एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत वसूल करण्यात आलेला अतिरिक्त आयात-शुल्क आता बेकायदा ठरला आहे. या बेकायदा वसुलीचा परतावा मिळावा यासाठी मोठमोठ्या कंपन्यांनी न्यायालयांचे दरवाजे ठोठावणे सुरू केले आहे. ही सर्व प्रकरणे साहजिकच सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचतील. सर्वोच्च न्यायालयाने आताच्या निकालात अतिरिक्त वसुलीच्या परताव्याबाबत भाष्य केलेले नाही. पुढे, सर्वोच्च न्यायालयाने परताव्याच्या बाजूने निर्णय दिला तर त्याचा प्रचंड बोजा अमेरिकी सरकारवर पडणार आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ दरम्यान जमा झालेला अतिरिक्त आयात-कर हा १३३ बिलियन डॉलर एवढा होता, जो आकडा ६ फेब्रुवारी २०२६ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावेळी १५० बिलियन डॉलरपर्यंत पोहोचला असण्याचा अंदाज आहे. या रकमेपैकी काही भाग ट्रम्प प्रशासनाने शेतर्कयांना सबसिडीच्या रूपात देऊ केला आहे, जो शेतर्कयांकडून प्रत्यक्ष वसूल करणे राजकीय सोयीचे नाही. याशिवाय, ट्रम्प प्रशासनाने मध्यम व निम्नमध्यम वर्गातील कुटुंबांना दोन हजार डॉलरचे अनुदान देण्याची योजना तयार केली होती. ही योजना आता बारगळण्याची चिन्हे आहेत, ज्याचा फटका ट्रम्प यांच्या लोकप्रियतेला बसू शकतो. याचप्रमाणे, अतिरिक्त आयात-शुल्कातून सरकार खजिन्यात जमा झालेल्या रक्कमेतून ५०० बिलियन डॉलरचा महत्त्वाकांक्षी संरक्षण अर्थसंकल्प ट्रम्प यांना साकार करायचा होता. या महत्त्वाकांक्षेला आता कात्री लावण्याची वेळ येणार आहे.

**पुन्हा उलथापालथ**

ट्रम्प प्रशासनापुढे उभी ठाकलेली दुसरी अडचण म्हणजे ज्या देशांशी मागील नऊ महिन्यांमध्ये व्यापार करार केले आहेत, ते आयात-शुल्काला अन्योन्य न्याय लावत लादलेल्या अतिरिक्त करांच्या संदर्भात करण्यात आले होते. या पैकी बहुतांश द्विपक्षीय करारांमध्ये अमेरिकेने दुर्सया पक्षावर १५ टक्केपेक्षा अधिक कर लावलेला आहे. पण आता जास्तीत जास्त आयात कर हा १५ टक्केच असणार आहे. अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे भारत, चीन, दक्षिण कोरिया, जपान, आशियान गटातील बहुतांश देश, ब्राझिल, कॅनडा, तुर्की या अमेरिकेशी मोठा व्यापार असर्णाया देशांवरील आयातकर २४ फेब्रुवारीपासून कमी झाला आहे. याउलट, अनेक देश ज्यांच्यावरील कर ट्रम्प प्रशासनाने व्यापार कराराच्या माध्यमातून किरकोळ केला होता, त्यांच्यावर सुद्धा आता १५ टक्के कर लागू झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने, युनायटेड किंग्डम, रशिया, ऑस्ट्रेलिया, सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिरात आणि अर्जेंटिना या देशांचा समावेश आहे. या देशांवरील आयात-कर कमी करण्यामागे ट्रम्प यांचे उद्देश हे आर्थिक नव्हे तर सामरिक व राजकीय होते. त्यामुळे, नजिकच्या काळात या देशांवरील आयात-करात कपात होण्याची ठोस शक्यता आहे. युरोपीय महासंघावरील आयात-कर आधी सुद्धा १५ टक्केच होता, त्यामुळे युरोपीय देशांच्या बाबत बदल घडलेला नाही. पण, युरोपीय उत्पादकांना आता चीन, जपान, भारत, व्हिएतनाम अशा देशांशी स्पर्धा करावी लागणार आहे. या उलथापालथीने जागतिक व्यापाराची वार्षिक गणिते पुन्हा बदलणार आहेत.

**भारताच्या पदरी काय?**

दिल्लीस्थित आयात-निर्यात धोरणाचे तज्ज्ञ, अजय श्रीवास्तव यांच्या मते ट्रम्प यांनी घोषित केलेले १५ टक्के आयात-कराचे धोरण सरसकट सर्व उत्पादनांना लागू नाही. जास्तीत-जास्त १५ टक्के आयात-कर असेल, पण अनेक वस्तूंवर तो १५ टक्क्यांपेक्षा कमी असू शकतो. त्याचवेळी, अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची बांधिलकी स्टील व ॲल्युमिनियम आणि ऑटो घटकांच्या आयातीवर नाही. त्यामुळे, त्यांच्यावरील आयात-शुल्क अनुक्रमे ४० टक्के आणि २५ टक्के असणार आहे. भारतातून अमेरिकेला होर्णाया ६० टक्के नियार्तीवरील शुल्क १८ टक्क्यांऐवजी १५ टक्के किंवा त्याहूनही कमी झाले आहे. पण, एप्रिल २०२५ पूर्वी भारतीय मालाच्या आयातीवर असलेले सरासरी तीन टक्के आयात शुल्क पूर्ववत होणार की ते वस्तुनुरूप तीन टक्के ते १५ टक्के या दरम्यान असणार याबाबत फार स्पष्टता निदर्शनास येत नाही. अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वी चिनी आयातीवरील आयात-शुल्क ४५ टक्के होते, जे आता भारताप्रमाणे १५ टक्क्यांपर्यंत असणार आहे (स्टील, ॲल्युमिनियम, ऑटो घटक वगळून). म्हणजे, आता अस्तित्वात आलेल्या चौकटीत भारतीय निर्यातकांना चीनशी तीव्र स्पर्धा करावी लागणार आहे.

अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर भारताने अमेरिकेशी होऊ घातलेल्या व्यापार-कराराच्या चौकटीतून बाहेर पडणे आवश्यक झाले आहे. भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने व्यापार कराराच्या चर्चेकरिता अमेरिकेस जाणाऱ्या शिष्टमंडळाला द्विपक्षीय सहमतीने स्थगिती दिली आहे. अमेरिकेतील काही राज्यस्तरीय न्यायालयांनी ट्रम्प यांच्या टेरिफ-युद्धाविरुद्ध निर्णय दिले होते आणि सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांनी नोंदविलेल्या विधानांमुळे निर्णय ट्रम्प यांच्या विरुद्ध लागण्याच्या शक्यता वर्तवल्या जात होत्या. त्यामुळे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वी भारताने द्विपक्षीय कराराच्या चौकटीला मान्यता दिली नसती तर व्यापार-करारावरील चर्चेत भारताची बाजू अधिक भक्कम असती असे म्हणण्यास वाव आहे. परंतु, मुळात द्विपक्षीय व्यापारी कराराच्या चौकटीची घोषणाच एकपक्षीय होती, जी ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर जाहीर केली होती. आता, जाहीर करण्यात आलेल्या व्यापार चौकटीतील किमान पाच मुद्द्यांवर असहमती दर्शवत नवी चौकट तयार करण्याचा आग्रह भारताने धरावयास हवा. एक, भारताने रशियाकडून तेल विकत घ्यावे की नाही, हा भारत-अमेरिका व्यापार करारातील मुद्दा असू शकत नाही. दोन, भारतात होर्णाया अमेरिकी मालाच्या आयातीवर शून्य टक्के आयात-शुल्क मान्य करण्याची गरज नाही.

तीन, अमेरिकेकडून ५०० बिलियन डॉलरची आयात करण्याची भारताची इच्छा हा द्विपक्षीय व्यापार कराराचा भाग असण्याची गरज नाही. चार, अमेरिकी शेतीमाल व दुग्ध-पदार्थांच्या आयातीबाबत ठोस स्पष्टता असणे अत्यावश्यक आहे. पाच, भारतीय कुशल कामगारांना अमेरिकी व्हिसा मिळण्याबाबत उदार धोरणाचा व्यापार करारात समावेश करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे आयात-शुल्क धोरण जमीनदोस्त झाले आहे आणि हा ट्रम्प यांच्या राजकीय व वैयक्तिक प्रतिष्ठेला देशांतर्गत व जागतिक स्तरावर बसलेला हादरा आहे. मागील सव्वा वर्षापासून डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारतावर कुरघोडी करत आहेत. आता ट्रम्प यांच्यावर दबाव आणण्याची संधी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून भारताला प्राप्त झाली आहे. यातून भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधांतील तारतम्य व सन्मान पुनर्स्थापित करण्याचा मार्ग सरकारला निर्माण करावा लागणार आहे.

# पॅनकेक झटपट आणि चविष्ट

**साहित्य :-** २ वाटी मैदा किवा गव्हाचे पीठ, ३ चमचे पिठीसाखर, १ चमचा बेकिंग पावडर, अर्धा चमचा बेकिंग सोडा, ३ चमचे तूप, १ ते दिड वाटी दूध. १ चमचा, व्हॅनिला एस्सेंस



**कृती:-** मैदा, पिठीसाखर, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा, व्हॅनिला, मेल्टेड तुप हे सर्व साहित्य व्यवस्थित एकत्र करुन घ्यावे. यानंतर यामध्ये थोडे-थोडे दुध घालून मिश्रण थोडे सैलसर करावे. इडलीच्या मिश्रणाप्रमाणे हे मिश्रण तयार झाले पाहीजे. जास्त पातळ करु नये. आता हे मिश्रण पाच मिनिटासाठी झाकून ठेवावे. यानंतर (अगदी बारीक आचेवर) नॉनस्टीक पॅन वरती थोडेसे तुप लावून घ्यावे, व त्यावर पळीने थोडे-थोडेसे मिश्रण घालावे (फुलक्या एवढेच लहानसे पसरावे). एका बाजुने भाजून दुसया बाजूनेही सोनेरी सर भाजून घ्यावे. ही अगदी साधीसोपी एगलेस पॅन केकेची रेसिपी आहे.

**टिप्स -**

- बेकिंग सोडा आणि बेकिंग पावडर या दोघांचे गुणधर्म वेगवेगळे आहेत. त्यामुळे हे दोन्ही वापरले जाते.
- जर या मिश्रणामध्ये बेकिंग सोडा ऐवजी एक अंडे फेटून घातले तर तो पॅनकेक ही चविष्ट लागतो.

# मजबूत केसांसाठी आहारात सामील करा या वस्तू

**केसांच्या सुंदरतेसाठी आपण काय नाही करत.. स्पा, तेलाने मॉलिश आणि वेगवेगळे सौंदर्य प्रसाधने देखील वापरात आहात. परंतु काही आहार आपल्या केसांच्या सौंदर्यतेला आणि बळकटीला परत मिळ्वून देऊ शकतात. ते ही कुठल्याही प्रकाराचा त्रास न घेता. जाणून घेउया हे 5 आहार ज्यांचा सेवनाने आपल्या केसांच्या समस्यांचं निरसन होऊ शकतं.**



**पालक:** पालक खाणं फायदेशीर असतं. आरोग्याबरोबरच हे आपल्या केसांच्या गळतीला ही थांबवत. यात मुबलक प्रमाणात आयरन (लोखंड) मुबलक आढळल्यामुळे केसांसाठी हे वरदान ठरतं.



**गाजर :** लाल गोड गाजर चवी बरोबरच आपल्याला चांगले आरोग्य आणि सौंदर्य देखील देतं. तसेच हे व्हिटॅमिन ए चे चांगले स्त्रोत आहे. त्याच बरोबर यामध्ये असलेले कॅरोटीन आपल्या केसांना आणि डोळ्यांना सुरक्षित आणि सुंदर ठेवतं. आपल्या केसांना मूळापासून हे बळकट करत.

**दही:** दही खाल्याने देखील केसांची गळती थांबते. केस सुंदर आणि चमकदार बनतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी 6 आणि व्हिटॅमिन डी आपल्या केसांना नवे चैतन्य आणि चांगले आयुष्य देतं.

**रताळे :** ह्याला गोड बटाटा देखील म्हणतात. यात व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळतं. जे आपल्या केसांना बळकट करून केसांची गळती थांबवतं. आपल्या मुळांमध्ये आढळणारं तेल देखील सुरक्षित ठेवतं. जेणे करून आपल्या केसांना पोषण मिळतं.

**बेदाणे :** आपल्या केसांची वाढ होत नसल्यास काळजी करु नये. बेदाणे खाल्याने आपल्या केसांची जलद गतीने वाढ होते. यामध्ये आयरन( लोखंड) आणि मिनरल्स (खनिजे) मुबलक प्रमाणात असतात. जे आपल्या केसांना पोषण देतं.

# कडू कारल्याचे १४ गुणकारी फायदे वाचा आणि लगेच अमलात आणा

**हिरव्या भाज्यांमध्ये आपल्याकडे आकर्षित करणारं कारलं चवीला कडू जरी असले, तरी ही त्यापासून मिळणारे अनेक फायदे नक्की गोड आहेत. आपणास ठाऊक आहे का कारल्याचे हे आरोग्यविषयक फायदे ? जर नाही तर मग नक्की जाणून घेऊया कारल्याचे फायदे...**




- कारल्यामध्ये फास्फोरस मुबलक प्रमाणात आढळतं. हे कफ, बद्धकोष्ठता आणि पचनासंबंधी समस्या दूर करतं. कारल्याचा सेवनाने अन्नाचे पचन व्यवस्थित होते. तसेच भूक सुद्धा मोकळेपणाने लागते.
- दम्याचा त्रास असल्यास कारलं खूपच फायदेशीर ठरतं. या आजारात कारल्याची भाजी काही ही मसाले ना वापरता देखील भाजी बनवून खाल्याने फायदेशीर ठरतात.
- पोटात गॅस बनत असल्यास आणि अपचनामध्ये कारल्याच्या रस घेणे चांगलेच असते, जेणे करून आपल्यापासून हे आजार लांबच राहतं.
- कारल्याचा रस प्यायल्याने आपले यकृत बळकट होतच, त्याचबरोबर यकृताचे सर्व त्रास बरे होतात. दररोज नियमाने हे घेतल्यास एका आठवड्यात चांगले परिणाम दिसून येतात. कावीळ मध्ये देखील हे फायदेशीर आहे.
- कारल्याची पाने किंवा फळाला पाण्यात उकळवून प्यायल्याने, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, आणि कुठल्याही प्रकाराचे संसर्ग झाल्यास बरे होतात.
- उलट्या, जुलाब, किंवा कॉलरा झाला असल्यास कारल्याचा रसात काळंमीठ टाकून प्यायलास लगेच आराम मिळतो. जलोदर झाला असल्यास देखील दोन चमचे कारल्याचा रस पाण्यामध्ये टाकून प्यायल्याने फायदा होतो.
- अर्धांगवायूचा त्रास झाला असेल तरी ही कारलं खाणे खूप प्रभावी उपाय आहे. त्यात कच्च कारलं रुग्णासाठी फायदेशीर आहे.
- रक्त स्वच्छ करण्यासाठी देखील कारलं अमृता सारखे आहेत. मधुमेहाचा आजारांसाठी देखील हे प्रभावी मानले आहे. मधुमेह असल्यास एक चतुर्थांश कप कारल्याचे रस, तेवढ्याच प्रमाणात गाजराचा रस पिणे शरीरासाठी फायदेशीर आहे.
- रक्ताळ मूळव्याध झाली असल्यास 1 चमचा कारल्याच्या रसात अर्धा चमचा साखर टाकून प्यायल्यास मूळव्याधीच्या त्रासात आराम मिळतो.
- संधिवात किंवा हातपायाची जळजळ होत असल्यास कारल्याच्या रस चोळणे फायदेशीर असतं.
- मूत्रपिंड (किडनी)च्या त्रासासाठी कारल्याचे उकळलेले पाणी आणि कारल्याचा रस दोन्हीही फायदेशीर असतात. ह्याचा सेवनाने मूत्रपिंड सक्रिय होऊन शरीरातील हानिकारक पदार्थांना शरीराच्या बाहेर काढते.
- हृदयाच्या विकारांसाठी कारलं हे रामबाणच आहे. हे हानिकारक चरबीला हृदयाचा रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ देत नाही. यामुळे रक्त पुरवठा व्यवस्थित होतो आणि हृदयाघात होण्याची शक्यता नसते.
- लिंबाच्या रसाबरोबर कारल्याचे रसाला चेहऱ्यावर लावल्याने मुरूम बरे होतात, आणि त्वचेचे आजार होत नाही.
- कर्करोगाशी लढण्यासाठी कारल्याच्या रसाचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

# गुगल क्रोम मराठीत कसं वापरायचं? जाणून घ्या सोपी पद्धत

जर तुम्ही गुगल क्रोम इंग्रजी व्यतिरिक्त मराठी व अन्य भाषांमध्ये देखील वापरता येतं. जाणून घ्या भाषा बदलण्याची सोपी गुगल क्रोम जगभरातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या वेब ब्राउजर पैकी एक आहे. लोक वेब ब्राउजिंगसाठी गुगल क्रोमला पसंती देतात कारण ह्याचा युजर इंटरफेस सोपा आहे. गुगल क्रोममध्ये अनेक असे फीचर्स आहेत जे उपयुक्त ठरतात. त्यात अनेक भाषांचा सपोर्ट देखील दिला जतो. गुगल क्रोम सुरुवातीपासून इंग्रजी भाषेत येतो पण ह्यात इतर भाषांचा सपोर्ट देखील आहे. जर तुम्हाला इंग्रजी भाषेत ब्राऊजर वापरायचं नसेल तर तुम्ही क्रोम मराठीसह अन्य स्थानिक भाषेत वापरू शकता.

गुगल क्रोम वर आपल्या आवडीची भाषा बदलणं खूप सोपं आहे. जर तुम्ही देखील इंग्रजी व्यतिरिक्त क्रोम इतर भाषेत वापरू इच्छित असाल तर हे आर्टिकल तुम्हाला उपयुक्त ठरेल. आज आम्ही तुम्हाला लॅपटॉप, कंप्यूटर, अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोमची भाषा बदलण्याची सोपी पद्धत सांगणार आहोत.

**पीसी वर क्रोम भाषा बदला**




- गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी तुम्हाला सर्वप्रथम आपल्या लॅपटॉप किंवा कंप्यूटरमध्ये गुगल क्रोम ओपन करावं लागेल.
- त्यानंतर लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यू ऑप्शनवर क्लिक करा आणि मग सेटिंग्स वर जा.
- इथे तुम्हाला लेफ्ट कॉर्नरवर Labguages चा ऑप्शन दिसेल.
- आता Add Languages वर क्लिक करा.
- Add Languages मध्ये तुम्हाला मराठीचा ऑप्शन दिसेल. तिथे क्लिक करून तुम्ही क्रोम मराठी व इतर भाषेत वापरू शकता.
- आता रिस्टार्टवर क्लिक करून गुगल क्रोम तुम्ही मराठी वापरू शकता.

**एंड्राइड वर क्रोम भाषा बदला**

- फोनवर गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी सर्वप्रथम तुमच्या अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोम ओपन करा.
- त्यानंतर टॉप-लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यूवर क्लिक करा.
- सेटिंग्समध्ये जाऊन Lanfguages वर जा.
- त्यानंतर गुगल क्रोम वर जाऊन मराठी भाषा निवडा.
- भाषा डाउनलोड झाल्यानंतर रिस्टार्टवर टॅप करा आणि मराठीत क्रोम वापरण्यास सुरुवात करा.

**नोटः** पुन्हा इंग्रजी भाषेत क्रोम वापरायचं असल्यास तुम्ही वरील प्रोसेस पुन्हा फॉलो करू शकता.

# आंघोळीच्या पाण्यात चिमुटभर मीठ मिसळण्याचे ४ आरोग्यदायी फायदे

**बदलत्या** वातावरणाचा परिणाम जसा थेट आरोग्यावर होतो तसाच तो त्वचेवरही होतो. ऋतूमानामध्ये बदल झाल्यानंतर त्वचाविकार जडण्याची शक्यता असते. त्वचाविकार हे काही काळापुरते वाढत असतात. अशावेळेस सुरूवातीच्या टप्प्यामध्ये अनेकदा लोकं आजाराकडे लक्ष देत नाही. जसाजसा त्रास वाढतो तसा त्रास अधिक गंभीर होऊ शकतो. म्हणूनच वेळीच या समस्येला रोखण्यासाठी पाण्यामध्ये चिमूटभर मीठ मिसळा.

## मीठ पाण्याने आंघोळ करण्याचे फायदे -

- स्कीन इन्फेक्शनचा धोका टाळण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात मीठ मिसळणं फायदेशीर आहे. या पाण्याच्या आंघोळीमुळे खाज येण्याच्या समस्येपासून सुटका मिळू शकते.
- त्वचेला तजेलदार ठेवण्याची क्षमता मीठाच्या पाण्यामध्ये आहे .कारण मीठ जंतूनाशक म्हणूनही काम करते.
- सांधेदुखीचा त्रास असर्णाया व्यक्तींना मीठाच्या पाण्याने आंघोळ करणं अधिक फायदेशीर आहे.
- कंबरेच्या दुखण्यावरही मीठाचे पाणी फायदेशीर आहे. मीठ आणि पाणी हे मिश्रण जसे जंतूनाशक असते तसेच दाहशामकदेखील आहे.

**माणसाची पचनक्रिया चांगली असेल तर त्याचे आरोग्य चांगले राहते. व्याधी उद्‌भवू नयेत किंवा रोगांचा शरीरात शिरकाव होऊ नये, यासाठी पचनक्रिया व्यवस्थित असणे फार महत्त्वाचे असते. पचन बिघडले की अनेक आजार सुरू होतात. पचन बिघडण्यामागे अनेक कारणे असतात.**

# अपचन : घरच्या घरी मिळवा असा आराम

वेळीअवेळी अरबट चरबट खाणे, अति तेलकट, जड पदार्थांचे वारंवार सेवन, अपुरी झोप, पोट साफ न होणे, दीर्घकाळ काहीही न खाणे यामुळे अपचन होते आणि त्याचा परिणाम म्हणजे पोटात जळजळ, करपट ढेकर, पोटदुखी, पोट फुगणे, उलटी, जुलाब अशी लक्षणे दिसू लागतात. थंडीच्या तुलनेत उन्हाळ्यात अपचन होण्याचे प्रमाण अधिक असते.

अपचन अति खाण्यापिण्यामुळे झाले असेल तर त्यावर काही घरगुती उपचार जरूर करावेत. त्याने बराच आराम मिळतो. अपचनाचा त्रास होऊ लागला की घरात वेलदोडा असतो, त्याची कुटून पूड करावी आणि अर्धा चमचा पूड खडीसाखरेबरोबर घ्यावी. वेलदोडा पाचक आहे. तसेच तीन चिमूट जायफळ पूड आणि दोन चमचे लिंबू रस दररोज घेतल्यास ज्यांना नेहमी अपचन होते, त्यांची समस्या दूर होते.

धणेपूड आणि सुंठ यांचे मिश्रण पचनासाठी फार मदतगार ठरते. दोन चमचे धणेपूड, अर्धा चमचा सुंठ दोन ग्लास पाण्यात घालून उकळून थंड करावे. हे पाणी २-२ चमचे तीन वेळा घ्यावे. सुंठ आणि बडीशेप पचन सुधारण्यास मदत करणारे आहेत. पाव चमचा सुंठ, १चमचा बडीशेप आणि थोडी खडीसाखर सकाळ, दुपार, संध्याकाळ चावून खावी.

पोट फार दुखत असेल तर ओवा तव्यावर भाजून चावून खावा. त्यावर थोडे कोमट पाणी प्यावे. आल्याचा रस आणि सैंधव व थोडे हिंग यांचे चाटण करून ते घ्यावे. आल्याचे नुसते तुकडे चावून खावेत. हिंग पोट विकारांवर अतिशय उत्तम गुणकारी असून त्यामुळे गॅस कमी होण्यास मदत मिळते. हिंग कोमट पाण्यात घालून प्यावे किंवा पूड पोटावर चोळावी. सकाळी पिकलेले केळे खाल्ल्यानेही पचन सुधारते.



# घनदाट, मुलायम केसांसाठी लावा केळ्यांपासून तयार केलेला हेअर पॅक



**स्त्रियांचे खरं सौंदर्य त्यांच्या केसात दडलेलं असतं, असं म्हणतात. अनेक जणींना लांब, काळेभोर केस आवडतात. मात्र सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अशा लांबसडक केसांची काळजी घेणं शक्य होत नाही. केसांची काळजी ही लहानपणी आई घेते आणि नंतर मोठेपणी अनेक कारणांनी त्याकडे दुर्लक्ष होते आणि मग अचानक कधीतरी जाणवते... केस गळत आहेत, पिकताहेत, रुक्ष झालेत इत्यादी. मग त्यानंतर घनदाट, मुलायम आणि निरोगी केसांसाठी घरगुती उपाय करण्याकडे अनेकांचा कल असतो. आज आपण घनदाट केसांसाठी केळ्यांचा उपाय कसा करतात याची माहिती जाणून घेणार आहोत.**

केळी हे बिनबियांचे फळ आहे. निसर्गतःच जंतुनाशक वेष्टनामध्ये असल्याने केळ्यातून जंतूंची बाधा होत नाही, त्यामुळे आपोआपच सर्वांचे आरोग्य उत्तम राहते. वर्षभर उपलब्ध असणारे, सर्वांच्या खिशाला परवडणारे हे फळ आबालवृद्धांना आवडते. केळ्याला शास्त्रीय भाषेमध्ये 'मुसा पॅराडिसिअॅका' म्हटले जाते. केळ्यापासून तयार केलेला हेअर पॅक तुम्हाला घनदाट आणि निरोगी केस तसेच केसांची गळती, कोंडा थांबवतो. जाणून घेऊयात केळ्यांपासून हेअर पॅक कसा तयार करतात.

## सामग्री

- केळी
- एक चमचा मध
- एक चमचा केसाला लावायचे तेल
- एक चमचा दही.

## असा तयार करा हेअर पॅक

- केळ्यांची मिक्सरमध्ये पेस्ट तयार करून घ्या.
- या पेस्टमध्ये मध, तेल आणि दही टाकून पुन्हा मिक्सरमध्ये एकत्र करा.
- त्यानंतर या पेस्टला केसांवर लावा अन् चांगली मालीश करा.
- एक ते दोन तास ही पेस्ट केसावरच राहू द्या.
- तुमच्या नियमित शाम्पूने केसांना चांगले धुऊन घ्या आणि कंडीशनर लावा. कंडीशनर लावल्यानंतर कंगव्याने केसांना हळूहळू विंचरा; जेणेकरून केसांमधील केळ्याचा तुकडा किंवा हेअर पॅक राहणार नाही. त्यानंतर थोडा वेळ थांबा आणि पुन्हा कंगव्याने केस विंचरा.

# मासिक पाळी अनियमित होण्यामागील कारणे, दुर्लक्ष करू नका

स्त्रियांमध्ये मासिक पाळीचा कालावधी नियमित असणे चांगलेच असते. हे चांगल्या आरोग्याचे सूचक असते. जर ती उशिरा किंवा अनियमित येत असेल तर यामागची अनेक कारणे असू शकतात. जास्त वजन वाढणेदेखील पाळी उशिरा येण्याचे कारण असू शकते. याव्यतिरिक्त इतर कारणं कोणती असू शकतात, जाणून घेऊया...

- जास्त वजन किंवा लठ्ठपणादेखील मासिक पाळीच्या अनियमिततेचे प्रमुख कारण असू शकते. कधी कधी ही समस्या थायरॉईडच्या आजारामुळेसुद्धा उद्‌भवते. त्यासाठी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असते.
- कमी किंवा जास्त वयामध्ये मासिक पाळी सुरू होणेदेखील अनियमितता असू शकते. ही एक सामान्य गोष्ट असू शकते. कालांतराने हे नियमित होऊ शकते, काळजी करायचे काहीच कारण नाही.
- पॉलिसिस्टिक अंडाशय सिंड्रोम मासिक पाळी उशिरा येण्याचे एक गंभीर कारण असू शकतं, म्हणून जर का वरील दिलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य काही घडत असल्यास त्याची चौकशी केली पाहिजे.
- जास्त ताण आणि जास्त व्यायाम करणेसुद्धा मासिक पाळीच्या अनियमिततेचे कारण असू शकतं. अंडाशयावर आवरण (सिस्ट) बनल्यामुळेसुद्धा मासिक पाळीची अनियमितता असू शकते.


# पारिजातकाच्या फुलांचे आश्चर्यकारक फायदे

- **ताण कमी करते :** पारिजातकाच्या फुलांमध्ये ताण दूर करण्याची शक्ती असते. जीवनात हे फूल आनंद पसरवते. त्याच्या सुगंधामुळे मेंदूला शांतता मिळते.
- **थकवा निवळतो :** पारिजातकाची फुले रात्रीच्या वेळी उमलतात आणि सकाळी कोमेजतात. अशी आख्यायिका आहे की पारिजातकाला स्पर्श मात्र केल्यानेच अंगातला सर्व थकवा दूर होतो.
- **चिरतारुण्य :** पौराणिक कथेनुसार पारिजातकाच्या झाडाला स्वर्गातून पृथ्वीवर आणल्याचे मानले जाते. नरकासुराच्या वध केल्यावर श्रीकृष्ण स्वर्गात गेले असताना इंद्राने त्यांना पारिजातकाचे फूल दिले. कृष्णाने ते फूल देवी रुक्मिणीला दिले. देवी सत्यभामेला देवलोकाची देवमाता आदितीने नेहमी चिरतारुण्य राहण्याचा वर दिला. तेवढ्यात नारद तिथे आले आणि त्यांनीही सत्यभामेला पारिजातकाची महती सांगितली. त्या प्रभावामुळे देवी रुक्मिणी पण चिरतारुण्यवती झाली. सत्यभामेला हे कळल्यावर ती क्रोधीत झाली. तीने श्रीकृष्णाकडून पारिजातक वृक्ष घेण्याचा आग्रह धरला. अशी आख्यायिका आहे की, पारिजातकाच्या वृक्षाचा उगम समुद्रमंथनाच्या वेळेस झाला होता; ज्याला इंद्राने आपल्या बागेत लावला होता.



- **हृदयविकारावर फायदेशीर :** पारिजातक हृदयविकारामध्ये फायदेशीर असते. १५ ते २० फुलांचा रस घेणे हृदयासाठी फायदेशीर असते. हृदयरोग रोखण्यासाठी हा एक प्रभावी मार्ग आहे. हा उपाय डॉक्टरांच्या सल्ल्याने करायला हवा.

# अनुलोम, विलोम म्हणजे काय? हे घरी कसे करावे?



**प्राणायामाची सुरुवातीची क्रिया आहे अनुलोम आणि विलोम. यामुळे मेंदूमध्ये ऑक्सिजनची पातळी वाढते. यामुळे फुफ्फुसं बळकट होतात. कोरोनाच्या संसर्गाच्या काळात आपले फुफ्फुस बळकट असणे गरजेचे आहे. जाणून घेऊ या अनुलोम, विलोम प्राणायाम कसा करावा...**

प्राणायामात ३ क्रिया करतात

**१. पूरक,**
**२. कुंभक,**
**३. रेचक**


यालाच हठयोगी अभ्यानंतर वृत्ती, स्तंभ वृत्ती आणि बाह्य वृत्ती असेही म्हणतात. हेच अनुलोम आणि विलोम आहे. नाडीशोधन प्राणायामाची ही सुरुवातीची क्रिया असते.

**१. पूरक :** नियंत्रित वेगाने श्वासाला आत घेण्याची क्रिया पूरक असते. श्वास आत घेताना किंवा बाहेर सोडताना दोन्ही वेळेस त्यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे असते.

**२. कुंभक :** आत घेतलेल्या श्वासाला क्षमतेनुसार रोखून धरण्याच्या प्रक्रियेला कुंभक म्हणतात. श्वास आत रोखण्याची क्रिया आंतरिक कुंभक आणि श्वासाला बाहेर सोडून काही वेळ थांबण्याच्या क्रियेला बाह्य कुंभक म्हणतात. यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे आहे.

**३. रेचक :** आत घेतलेला श्वास हळुवारपणे सोडण्याच्या क्रियेला रेचक म्हणतात. यामध्ये श्वास घेताना आणि सोडताना दोन्ही वेळेस लय आणि अनुपात असायला हवा.

**फायदे :** सर्व प्रकारचे ताणतणाव कमी करून शांती देणाऱ्या या प्राणायामामुळे शरीराच्या सर्व नाड्यांना लाभ मिळतो. डोळे सतेज होतात, रक्तपुरवठा सुरळीत होतो. निद्रानाशाचा त्रास असल्यास त्यासाठी पण हे फायदेशीर आहे. त्याचबरोबर मेंदूचे सर्व विकार दूर करण्यासाठी सक्षम आहे. या प्राणायामामुळे फुफ्फुसात साचलेली घाण बाहेर निघते आणि फुफ्फुसं बळकट बनतात. किमान १० मिनिटे अनुलोम, विलोम प्राणायाम केल्याने डोकेदुखीच्या आजारापासून मुक्ती मिळते. नकारात्मक विचारांपासून मन दूर होऊन आनंद आणि उत्साहात वाढ होते.



# वसई -विरारमधील पूरस्थिती टाळण्यासाठी होल्डिंग पाँड प्रकल्पाला गती



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पावसाळ्यात दरवर्षी उद्धवर्णाया पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून वसई –विरार शहरात होल्डिंग पाँड उभारण्याच्या हालचालींना वेग आला आहे. राज्य प्रशासनाने महापालिकेला तातडीने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. हा प्रकल्प राबवला गेल्यास पावसाचे पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

वसई– विरार परिसरात मुसळधार पावसानंतर अनेक सखोल भागात पाणी साचते. घरांमध्ये पाणी शिरणे, दुकाने व वाहनांचे नुकसान, तसेच वाहतुकीची अडचण अशी परिस्थिती दरवर्षी निर्माण होते. या समस्येवर दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी नालासोपाराचे आमदार राजन नाईक यांनी राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर आपत्ती व्यवस्थापन विभागाने संबंधित अधिकार्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

पालघर जिल्हाधिकार्यांनी वसई– विरार महापालिका प्रशासनाला राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रकल्प अहवाल तयार करण्यास सांगितले आहे. या योजनेअंतर्गत पावसाचे ज्यादा पाणी एका मोठ्या तलावात साठवले जाईल आणि नंतर ते हळूहळू बाहेर सोडले जाईल. त्यामुळे नाले आणि गटारांवरील ताण कमी होऊन शहरातील पुरस्थिती नियंत्रणात राहण्यास मदत होईल. तज्ज्ञ संस्थांच्या अभ्यासानुसार या प्रकल्पासाठी सुमारे 117 कोटी 92 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सुरुवातीला काही निधी उपलब्ध करून कामाला सुरुवात करण्याचा प्रस्ताव आहे. तलावासाठी योग्य जागा निश्चित करणे आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

दरवर्षी पावसामुळे होणारे कोट्यवधी रुपयांचे नुकसान टाळण्यासाठी हा प्रकल्प महत्वाचा ठरणार असल्याचे सांगितले जात आहे. प्रकल्प लवकरात लवकर मंजूर करून काम सुरू करावे अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# गिग कामगारांसाठी राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ

## कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची विधानसभेत माहिती

■मुंबई। प्रतिनिधी,

गिग कामगारांसाठी आतापर्यंत कोणत्याही प्रकारची उपाययोजना नव्हती. परंतु, महाराष्ट्रात स्वतंत्र कायदा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंद्र सरकारने सामाजिक सुरक्षा संहिता २०२० मंजूर करून त्याची अंमलबजावणी २१ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू केली आहे. या संहितेत प्रथमच गिग आणि प्लॅटफॉर्म वर्करची स्पष्ट व्याख्या करण्यात आल्याने या कायद्यानुसार राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन होणार असल्याची माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी शनिवारी विधानसभेत दिली.



आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात काँग्रेसच्या हेमंत ओगले यांनी राज्यातील गिग कामगारांसाठी नोंदणी, विमा आणि सामाजिक सुरक्षा योजना लागू करण्याबाबत प्रश्न विचारला होता. यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना फुंडकर यांनी गिग कामगारांसाठीच्या योजनांची माहिती दिली.

राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळाच्या माध्यमातून कामगारांना जीवन आणि अपंगत्व विमा, आरोग्य आणि मातृत्व लाभ, वृद्धापकाळ संरक्षण, शिक्षण सहाय्य आणि इतर लाभ देण्यात येतील. राज्यस्तरावरही असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यातील गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळणार असल्याचे फुंडकर यांनी सांगितले. शिवसेना ठाकरे गटाच्या राहुल पाटील, भाजपच्या अतुल भातखळकर यांनी उपप्रश्न विचारले.

### मुंबईतील एनटीसी कामगारांसाठी सरकार भूमिका घेणार

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या एनटीसी मिलमधील कामगारांना थकीत वेतन अदा करण्याचा प्रश्न केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतो. तथापि राज्य सरकार या प्रकरणात सक्रिय भूमिका घेईल, असे आकाश फुंडकर यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले.

मुंबईतील एनटीसी मिलमधील कामगारांना थकीत वेतन अदा करण्याबाबत काँग्रेसच्या ज्योती गायकवाड यांनी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना फुंडकर म्हणाले, एनटीसीच्या कामगारांवर अन्याय होऊ नये, त्यांच्या थकीत वेतनासह सर्व देणी वेळेत मिळावी यासाठी केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने कार्य करीत आहे. आवश्यकतेनुसार मंत्रालयात बैठक घेऊन अशा सर्व प्रकरणांवर निर्णय घेण्यात येईल.

# रेल्वे जमिनीवरील झोपड्या १५ दिवसांत रिकाम्या करा! उच्च न्यायालयाचा आदेश

■मुंबई। प्रतिनिधी,

रेल्वेच्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या झोपडीधारकांना उच्च न्यायालयाने शुक्रवारी मोठा झटका दिला. मालाड (पूर्व) येथील रेल्वेच्या जमिनीवर असलेल्या अनधिकृत झोपड्या आणि बांधकामे १५ दिवसांच्या आत रिकामी करून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. झोपडीधारकांनी पश्चिम रेल्वेच्या इस्टेट ऑफिसरकडून देण्यात आलेल्या निष्कासनाच्या आदेशाला आव्हान दिले होते. न्यायालयाने संबंधित २५ याचिका फेटाळून लावल्या.

मालाड पूर्वेकडील राजो टाक व इतरांनी दाखल केलेल्या तब्बल २५ याचिकांवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. खंडपीठाने सविस्तर सुनावणी घेत ५४ पानी निकालपत्र जाहीर केले आहे. मालाड येथील चिंचोली फाटक आणि



धोबी घाट परिसरात रेल्वेच्या जागेवर अनेक वर्षांपासून अनधिकृत बांधकामे होती. त्यात मोठ्या प्रमाणावर झोपड्यांचा समावेश होता. याचिकाकर्त्या झोपडीधारकांच्या म्हणण्यानुसार, ते या जागेवर १९८० पासून राहत आहेत. त्यामुळे आपण ह्यमुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्टह्ण (एमयूटीपी) अंतर्गत पुनर्वसनासाठी पात्र आहोत, असा दावा झोपडीधारकांच्या वतीने वकिलांनी केला. मात्र, रेल्वे प्रशासनाने त्याला तीव्र विरोध केला.

संबंधित बांधकामे रेल्वेच्या ६ व्या मार्गिकेच्या कामात अडथळा ठरत आहेत. त्यामुळे ती पुनर्वसन धोरणाच्या कक्षेत येत नसल्याचे रेल्वे प्रशासनातर्फे सांगण्यात आले. दोन्हीकडील युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर राखून घेतल्यानंतर न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने १७ फेब्रुवारीला निकाल राखून ठेवला होता. सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांसाठी रेल्वेची जमीन रिकामी करणे आवश्यक आहे, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले आणि झोपडीधारकांना जागा रिकामी करण्याचे आदेश दिले.

# दुसऱ्या धर्मातील मुलावर प्रेम केल्याचा राग, भावाने बहिणीला संपवलं

■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातल्या संभल जिल्ह्यातील मतावली पट्टी जग्गू गावात सध्या स्मशान शांतता पसरली आहे. १८ वर्षांच्या रूपजहां आणि शिवम सैनी यांच्या अपूर्ण राहिलेल्या लव्हस्टोरीचा अंत रक्ताच्या नात्यांनीच केला आहे. ज्या ओढणीने बहिणीचे रक्षण करायला हवे होते, त्याच ओढणीने भावाने बहिणीचा श्वास रोखला.

### काय आहे नेमकं प्रकरण?

मिळालेल्या माहितीनुसार, रूपजहां आणि तिच्या घरापासून अवघ्या ४०० मीटर अंतरावर राहणारा शिवम सैनी यांचे गेल्या एक वर्षापासून प्रेमसंबंध होते. शिवमच्या कुटुंबाचा या लग्नाला विरोध नव्हता, मात्र रूपजहांचे कुटुंबीय धर्माच्या नावाखाली या नात्याच्या विरोधात होते. दोन महिन्यांपूर्वीच या दोघांनी गुपचूप लग्न केल्याचा दावा शिवमच्या आईने केला आहे.

### पोलीस ठाण्यातील पंचायत आणि पैशांचा व्यवहार

बुधवारी रूपजहां आणि शिवम घरातून निघून गेले होते आणि सुरक्षेसाठी पोलीस ठाण्यात पोहोचले होते. तिथे झालेल्या पंचायतीत मुलीने आपण सज्ञान असून शिवमसोबत राहू इच्छिते, असे स्पष्ट सांगितले. मात्र, गावातील सरपंचाने मध्यस्थी करून "प्रकरण मिटवण्यासाठी" ३ लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप मुलीच्या काकांनी केला आहे. त्यापैकी दीड लाख रुपये दिल्यानंतर मुलीला 'सगळं ठीक होईल' असं सांगून घरी परत आणण्यात आले.



### बापाचे क्रूर उद्गारः "इज्जत वाचवण्यासाठी हत्या योग्यच"

जेव्हा पोलीस घटनास्थळी पोहोचले, तेव्हा घराच्या अंगणात रूपजहांचा मृतदेह पडला होता. मुलीच्या मृत्यूचा शोक करण्याऐवजी तिचे वडील नौशे आलम कॅमेऱ्यासमोर म्हणाले, ''ती एका हिंदू मुलासोबत पळून गेली होती. गावकरी माझी थट्टा करत होते, माझं रस्त्यावरून चालणं कठीण झालं होतं. आम्ही तिला समजवण्याचा प्रयत्न केला पण ती ऐकली नाही. आम्ही मुसलमान आहोत, ती सैनी मुलाशी लग्न कसं करू शकते? माझ्या मुलाने तिची हत्या केली आणि मला याचा कोणताही पश्चाताप नाही. घरची इज्जत वाचवण्यासाठी अशा मुलीला मारणं योग्यच आहे.''

### काळजाचा थरकाप उडवणारी रात्र

गुरुवारी रात्री जेव्हा घरातील इतर सदस्य लग्नासाठी बाहेर गेले होते, तेव्हा घरी रूपजहां आणि तिचा भाऊ जाने आलम हे दोघेच होते. रूपजहां पुन्हा शिवमकडे जाण्याचा हट्ट करू लागली, तेव्हा संतापलेल्या जाने आलमने ओढणीने तिचा गळा आवळून तिची हत्या केली. हत्येनंतर त्याने स्वतःच पोलिसांना फोन करून गुन्ह्याची कबुली दिली.

### पोलिसांची कारवाई

संभलचे एसपी कृष्ण विष्णोई यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी भाऊ जाने आलम याला अटक करण्यात आली आहे. शिवमच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस आता सरपंच आणि पैशांच्या व्यवहाराच्या कोनाचीही चौकशी करत आहेत.

# रागाच्या भरात लिव्ह इन पार्टनरला ड्रग्ज देऊन गुप्तांग कापले



■मुंबई। प्रतिनिधी,

महिलेने रागाच्या भरात तिच्या लिव्ह इन पार्टनरचे गुप्तांग कापल्याची घटना दिल्लीतील वजीराबादमध्ये घडली. जखमी झालेला पुरुष हा एक बनावट डॉक्टर आहे, ज्याने अलीकडेच दुसरा विवाह केला होता. याचमुळे महिला नाराज झाली होती. जखमी झालेला पुरुष स्वतःहून रुग्णालयात गेला होता. पुरुषाने शस्त्रक्रिया केली, दरम्यान पोलीस महिलेला शोध घेत आहेत. पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपी महिलेचा शोध घेण्यासाठी बिहारमध्ये कटिहार येथे एक पथक पाठवले गेले.

### महिलेनं पुरुषाचे गुप्तांग छाटले

पोलिसांनी सांगितले की, हल्ला करण्यापूर्वी शायराने त्या व्यक्तीला ड्रग्ज दिले आणि नंतर संधी मिळताच तिने त्याचे गुप्तांग छाटले. हा तरुण गेल्या दोन वर्षांपासून वजिराबाद येथील रहिनासी असलेल्या आरोपी अमिना खातूनशी संबंधात होता. पीडितेनं आपल्या जबाबात म्हटलं की, तो 24 फेब्रुवारी रोजी दिल्लीत होता. त्याने दावा केला की, ते गेल्या दोन वर्षांपासून एकमेकांच्या परिचयाचे होते.

संबंधित प्रकरणात पोलिसांनी सांगितले की, संतप्त शायराने संधी साधून त्याचे गुप्तांग छाटून घटनास्थळावरून पळ काढला. शस्त्रक्रियेनंतर तरुणाचे अवयव पुन्हा जोडण्याचत आले आणि आरोपी महिलेच्या शोधासाठी पोलिसांचे पथक घेऊन रवाना झाले होते.

दरम्यान पीडित जखमी रमेशला सफरदजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. पोलिसांनी रुग्णालयात येऊन वैद्यकीय अहवान घेतला आणि पीडितेचा जबाब नोंदवला. पीडितेनं आरोप केला की, महिलेनं रात्री दुधात शामक औषध मिसळले होते.

### महिला पुरुषाशी लिव्ह इनमध्ये राहत होती

घडलेल्या घटनेनुसार, जगतपूर गावातील रमेश (वय 22) एक बनावट डॉक्टर आहे. तो क्लिनिक चालवतो, त्याची दोन वर्षांपूर्वी दोन मुलांची आई असलेल्या शायराशी ओळख झाली आणि ते वझिराबादच्या रोड क्रमांक 9 मध्ये लिव्ह इन पार्टनरमध्ये एकत्र राहू लागले आहेत. रमेशचे नुकतेच लग्न झाले होते, ज्यामुळे पत्नी शायराला वाईट अनुभव आला होता.

# ४१ वर्षीय मालकीणीवर लैंगिक अत्याचार... अखेर रंगेहाथ पकडले

■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील लखीमपूरमधील खीरी येथे आयुष (वय २८) याने त्याच्या मालकाच्या ४१ वर्षीय पत्नीवर लैंगिक अत्याचार केल्याने पोलिसांनी त्याला अटक केली. संबंधित पीडित महिला ही नैराश्यात होती, त्यामुळे ती स्वतः उपचार घेत होती. पीडित महिला ही औषधामुळे गाढ झोपी गेली होती, घरातील कामाची जबाबदारी असलेल्या आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

### आरोपीने जीवे मारण्याची दिली धमकी

वृत्तमाध्यमाने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १३ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली होती. महिलेनं औषध घेण्यास नकार दिला आणि आरोपीला रंगेहाथ पकडले. दरम्यान, तिने नकार दिला असता, आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी दिली होती, नंतर २३ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी गुन्हा दाखल केला, अशातच २५ फेब्रुवारी रोजी आरोपीला अटक करण्यात आली आहे.

### पीडितेनं सांगितला घटनेचा थरार

१३ फेब्रुवारी रोजी महिलेनं औषध घेतले नव्हते, त्याचदरम्यान आरोपीने नेहमीप्रमाणे तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला असता, तिने त्याला पकडून प्रतिकार केला. तेव्हा आरोपीने तिला गप्प राहण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी पीडितेनं धाडस करत तिच्यावर झालेला अत्याचार पोलिसांना सांगितला, पोलिसांनी तिची तक्रार नोंदवून घेतली

### महिला अनेक दिवसांपासून नैराश्यात

पीडितेनं तक्रारीत म्हटलं की, ती बऱ्याच दिवसांपासून नैराश्यात होती आणि तिने औषधे घेतली होती. यामुळे तिला गाढ झोप लागत होती. आरोपी आयुष हा तिच्या पतीच्या दुकानात काम करायचा आणि घरकामाला देखील मदत करायचा. याचा फायदा घेत, ती बेशुद्ध पडली असताना तिच्यावर अत्याचार करण्यात आला.



# गर्लफ्रेंडला आलिशान विलामध्ये भेटायला बोलावलं, अन् बॉयफ्रेंडने मित्रांशी संगनमत करुन कट रचला

■मुंबई। प्रतिनिधी,

कर्नाटकची राजधानी असलेल्या बंगळुरू शहरातून माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. एका १९ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीवर तिच्या प्रियकराने आणि त्याच्या मित्राने गुंगीचे औषध देऊन सामूहिक बलात्कार केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. जक्कूर येथील एका खासगी विलामध्ये हा अघोरी प्रकार घडला असून, आरोपींनी पीडितेचा विश्वास संपादन करून तिला आपल्या जाळ्यात ओढले होते. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, पोलिसांनी याप्रकरणी अमृतहल्ली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सखोल तपासाला सुरुवात केली आहे.

पीडित तरुणी ही बन्नेरघट्टा येथील एका नामांकित खासगी महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या तरुणीची ओळख इन्स्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून डिक्सिन नावाच्या तरुणाशी झाली होती. डिक्सिन हा मूळचा पश्चिम बंगालचा रहिवासी असून तो बंगळुरूमध्येच वास्तव्यास होता. जानेवारी महिन्यात दोघांमध्ये संवाद सुरू झाला आणि अवघ्या काही दिवसांतच डिक्सिनने तिला प्रपोज केलं होतं. तरुणीनेही त्याच्यावर विश्वास ठेवून प्रेमाचा स्वीकार केला. मात्र, प्रेमाच्या नावाखाली डिक्सिनच्या मनात काहीतरी वेगळेच शिजत होते, याची कल्पना पीडितेला नव्हती.

घटनेच्या दिवशी म्हणजे १४ फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने पीडित तरुणी आपल्या एका मैत्रिणीसोबत रात्री जेवण्यासाठी बाहेर गेली होती. त्याच वेळी डिक्सिनने तिला फोन करून जक्कूर येथील एका खाजगी विलामध्ये भेटण्यासाठी बोलावले. प्रियकरावर विश्वास ठेवून ती तिथे पोहोचली. तिथे काही वेळ गप्पा मारल्यानंतर डिक्सिनने तिला जबरदस्तीने एक गुलाबी रंगाची गोळी खाऊ घातली. ही गोळी खाल्ल्यानंतर काही वेळातच तरुणी बेशुद्ध झाली. ती बेशुद्ध असतानाच डिक्सिन आणि त्याचा मित्र निखिल या दोघांनी तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा पीडितेला शुद्ध आली, तेव्हा तिला आपल्यासोबत घडलेल्या प्रकाराची जाणीव झाली.

या नराधमांनी केवळ तिचे शोषण केले नाही, तर तिला तोंड उघडल्यास जीवे मारण्याची धमकीही दिली. आरोपी निखिलने तिला बजावले की, जर तिने या घटनेबद्दल कोणालाही सांगितले तर तिची हत्या केली जाईल. या भीषण प्रसंगामुळे आणि धमकीमुळे पीडिता प्रचंड हादरली होती. काही दिवस ती दहशतीखाली आणि मानसिक धक्क्यात होती. मात्र, नंतर तिने धैयार्ने आपल्या कुटुंबाला घडलेला सर्व प्रकार सांगितला. कुटुंबाच्या मदतीने तिने पोलीस ठाणे गाठून आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून सामूहिक बलात्कार आणि धमकावल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून तपास चक्रे वेगाने फिरवली आहेत.

या संपूर्ण प्रकरणाला आता एक नवे आणि धक्कादायक वळण मिळाले आहे. पोलीस उपायुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेने गुन्हा दाखल करण्यापूर्वीच, २१ फेब्रुवारी रोजी आरोपींनी मल्लेश्वरम पोलीस ठाण्यात पीडित तरुणी आणि तिच्या एका मित्राच्या विरोधात खंडणी मागितल्याचा प्रति-गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे हे प्रकरण आता अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. पोलीस आता या दोन्ही बाजूंच्या दाव्यांची सत्यता पडताळून पाहत आहेत. एका बाजूला बलात्काराचा गंभीर आरोप आहे, तर दुसऱ्या बाजूला खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तांत्रिक पुरावे, विलातील सीसीटीव्ही फुटेज आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलीस या प्रकरणाचा छडा लावण्याचा प्रयत्न करत आहेत.

# कराटे क्लासमधील 'करण' निघाला जावेद, प्रेमाच्या जाळ्यात अडकून अत्याचार... अश्लील व्हिडीओ बनवून ब्लॅकमेलिंग

■मुंबई। प्रतिनिधी,

मध्य प्रदेशातील इंदूरमध्ये 'लव्ह जिहाद'चा एक खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका कराटे ट्रेनरने स्वतःची खोटी ओळख सांगून एका तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी शुक्रवारी उशिरा रात्री आरोपीला अटक केली आहे.

### 'करण सिंह' असल्याचं सांगून केली मैत्री

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी महू परिसरातील रहिवासी आहे. 2020 मध्ये डॉ. आंबेडकर विद्यापीठात शिक्षण घेत असताना ती महू येथील एका कराटे क्लासमध्ये जात होती. तिथे एका तरुणाने आपले नाव 'करण सिंह' असल्याचे सांगून तिच्याशी मैत्री केली. हळूहळू या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. १४ जानेवारी २०२४ रोजी घरात कोणीही नसताना आरोपीने तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर वारंवार लग्नाचे खोटे आश्वासन देऊन त्याने तिचे शोषण केले.



### असा झाला नावाचा पदार्फाश

आरोपीच्या खोट्या ओळखीचा खुलासा एका कार्यक्रमादरम्यान झाला. कराटे क्लासमध्ये बेल्ट ग्रेडिंगचा कार्यक्रम सुरू असताना, जेव्हा 'जावेद' असे नाव पुकारण्यात आले, तेव्हा करण सिंह म्हणून ओळख सांगणारा तरुण प्रमाणपत्र घेण्यासाठी पुढे गेला. यामुळे पीडितेला संशय आला. तिने विचारणा केली असता, आरोपीने त्याचे खरे नाव जावेद अख्तर असल्याचे कबूल केले. सत्य समोर आल्यानंतर तरुणीने विरोध केला असता, त्याने तिला जीवे मारण्याची आणि बदनामी करण्याची धमकी दिली.

### पोलिस कारवाई

शेवटी पीडितेने आपल्या कुटुंबाला आणि सामाजिक संघटनांना या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवण्यात आली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा मोबाईल डेटा आणि सोशल मीडिया अकाउंट्सची तांत्रिक तपासणी सुरू आहे.पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवत आरोपी जावेद अख्तरला अटक केली आहे.

### अश्लील फोटो व्हायरल करून ब्लॅकमेल

पीडितेने आरोपीपासून दूर जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा जावेदने टोकाचे पाऊल उचलले. त्याने इन्स्टाग्रामवर बनावट आयडी तयार करून तरुणीचे फोटो एडिट केले आणि अश्लील फोटो–व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केले. इतकेच नाही तर हे फोटो तिच्या नातेवाईकांनाही पाठवून तिची बदनामी केली.

### धर्मांतरासाठी दबाव आणि भररस्त्यात राडा

२६ फेब्रुवारी २०२६ रोजी ही घटना अधिक गंभीर वळणावर पोहोचली. आरोपीने जुन्या एबी रोडवरील हनुमान मंदिराजवळ तरुणीचा हात धरून तिला जबरदस्तीने सोबत नेण्याचा प्रयत्न केला. "तुला मुस्लिम बनवून माझ्याकडेच ठेवणार," अशी धमकीही त्याने दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. यावेळी मध्यस्थी करणाऱ्या एका व्यक्तीलाही त्याने जीवे मारण्याची धमकी दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com